# महाराष्ट्र विधानपरिषद

## तिसरे (हिवाळी) अधिवेशन, २०२१

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### रत्नागिरी येथील प्रादेशिक मनोरुग्णालयातील विविध संवर्गातील पदे भरण्याबाबत

**(१) ३७९३ (१९-०६-२०२०) श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्री.महादेव जानकर, श्री.रमेशदादा पाटील, श्री.विनायकराव मेटे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी येथील प्रादेशिक मनोरुग्णालयात चार जिल्ह्यातून रुग्ण उपचारासाठी येत असतानाही, सदर रुग्णालयातील अधीक्षक वर्ग-१ हे पद वर्षभर रिक्त असून, उपअधीक्षक वर्ग-१, मनोविकृतीतज्ज्ञ, अधिरीकरण शास्त्रज्ज्ञ आदी विविध संवर्गातील ६८ पदे मागील काही वर्षापासून रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे उपलब्ध कर्मचाऱ्यांवर कामाचा अधिकचा ताण पडत असल्याने येथे औषधोपचारासाठी येणाऱ्या रुग्णांना औषधोपचारापासून वंचित रहावे लागत असून त्यांच्या नातेवाईकांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मनोरुग्णालयासाठी मंजूर असलेले १४४ पदांपैकी ६८ पदे रिक्त असण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(४) तसेच, मनोरुग्णालय प्रशासनाने सर्व रिक्त पदे भरण्यात यावीत म्हणून शासनाकडे मागणी व पाठ पुरावा केला आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर मनोरुग्णालयातील रिक्त पदे विनाविलंब भरण्याच्यादृष्टीने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (१५-११-२०२१) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
कार्यरत अधिकारी कर्मचारी यांच्याकडून रुग्णालयात औषधोपचारासाठी येणाऱ्या रुग्णांना औषधोपचारांपासून वंचित रहावे लागणार नाही, याची काळजी घेतली जाते.
(३) सदर मनोरुग्णालयातील रिक्त पदे विविध कारणांमुळे रिक्त झालेली असून ती त्वरेने भरण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) हे खरे आहे.
(५) महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ ते गट-ड मधील रिक्त पदे भरण्याच्या दृष्टीने, गट-अ संवर्गातील पदांचे मागणीपत्र महाराष्ट्र लोकसेवा आयोगास पाठविण्यात आलेली आहेत. तसेच, गट-क व गट-ड मधील रिक्त पदांची जाहिरात प्रसिध्द करण्यात येऊन उमेदवारांच्या परीक्षा घेण्यात आलेल्या आहेत.

---

## परभणी येथील वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठातील नोकर भरतीत गैरव्यवहार झाल्याबाबत

**(२) ४२६० (१५-०७-२०२०) श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परभणी येथील वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठातील नोकर भरतीत शासन निर्णयाचा सोयीप्रमाणे अर्थ लावण्यात आल्याने करण्यात

आलेल्या नोकरी भरतीत गैरव्यवहार झाल्याचा अहवाल जिल्हाधिकारी, परभणी यांनी शासनाकडे पाठविला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निवड समितीतील दोषी अधिकारी, कर्मचारी व इतर यंत्रणांनी केलेल्या नियमभंगाची व गैरव्यवहाराची उच्चस्तरीय चौकशी करण्यात यावी, अशी मागणी परभणी येथील लोकप्रतिनिधींनी प्रधान सचिव, कृषी विभाग यांच्याकडे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने नोकर भरतीतील गैरव्यवहार प्रकरणी संबंधित दोषी अधिकारी, कर्मचारी व यंत्रणा यांच्यावर कारवाई करुन नोकर भरती प्रकरणी अन्याय झालेल्या प्रकल्पग्रस्तांना न्याय मिळवून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (१२-११-२०२१) :** (१) वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यपीठ, परभणी येथील प्रकल्पग्रस्तांच्या भरतीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, परभणी यांचा अहवाल शासनास प्राप्त झालेला आहे.

(२) परभणी येथील लोकप्रतिनिधी यांचे निवेदन शासनास प्राप्त झाले आहे.

(३) जिल्हाधिकारी, परभणी यांच्या प्राप्त अहवालाच्या अनुषंगाने महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांच्या स्तरावर समिती गठीत करून अहवाल सादर करण्याचे निदेश देण्यात आलेले होते.तरी,सदर अहवाल प्राप्त झालेला असून त्यावर शासन स्तरावर कार्यवाही सुरू आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नागपूर विभागातील “स्व.गोपीनाथ मुंडे” शेतकरी अपघात विम्याची दावे प्रलंबित असल्याबाबत

**(३) ४६९३ (१८-०८-२०२०) श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.नागोराव गाणार, श्री.रामदास आंबटकर, श्री.प्रशांत परिचारक :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) "स्व. गोपीनाथ मुंडे" शेतकरी अपघात विमा योजनेच्या लाभाकरीता नागपूर विभागातील २०१ दाव्यांचे वारसदारांनी सर्व कागदपत्राची पूर्तता करूनही या लाभापासून वंचित राहिले असून विम्याचे रुपये ४.२ कोटी रखडले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, परिपूर्ण कागदपत्रे सादर केल्यानंतर दावे निकाली काढण्यास तीन महिन्यापेक्षा अधिक कालावधी झाल्यास विमा कंपनीने व्याजासह विमा भरपाई रक्कम द्यावी, अशी तरतुद शासनाकडून करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, विमा कंपनीच्या दिरंगाईमुळे शेतकरी व त्याचे कुटुंब या योजनेपासून वंचित राहिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शेतकरी अपघात विम्याची प्रलंबित दावे निकाली काढून वंचित राहिलेल्या लाभार्थ्यांना सदर योजनेचा लाभ देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (११-११-२०२१) :** (१) अंशत: खरे आहे.

दिनांक २७/०९/२०२१ पर्यंत सन २०१७-१८, २०१८-१९ व २०१९-२० मध्ये एकूण २०३६ विमा प्रस्ताव नागपूर विभागास प्राप्त झाले असून १२२१ विमा प्रस्ताव मंजूर झाले असून ५२४ विमा प्रस्ताव नामंजूर झाले आहेत. तसेच १८८ विमा प्रस्ताव कागदपत्रांअभावी प्रलंबित असून, १०३ विमा प्रस्ताव विमा कंपनीकडे कार्यवाहीत आहेत.

(२) विमा दावे निकाली काढण्यास तीन महिन्यापेक्षा अधिक कालावधी झाल्यास विमा कंपनीस व्याजासह विमा नुकसान भरपाईची रक्कम अदा करण्यास विमा कंपनीला सक्त सूचना देण्यात आलेल्या आहेत. व त्याबाबत या कार्यालयाकडून विमा कंपनीकडे सातत्याने पाठपुरावा चालू आहे.

(३) व (४) अंशत: खरे आहे. प्रलंबित विमा दाव्यांबाबत नियमितपणे प्रकरणनिहाय आढावा घेऊन कागदपत्रांची पुर्तता क्षेत्रिय स्तरावरुन करुन घेण्याची कार्यवाही तसेच त्या अनुषंगाने सातत्याने विमा कंपनीच्या कामकाजाचा नियमित आढावा घेऊन आवश्यक त्या कार्यवाहीचे आयुक्त कार्यालयामार्फत वेळोवेळी निर्देश देण्यात आलेले आहेत.

(५) सदर योजनेतंर्गत विमा प्रस्ताव हे शेतकरी कुटुंबाकडून आवश्यक असणाऱ्या कागदपत्राच्या पुर्ततेअभावी प्रलंबित राहतात. बहुतांशी प्रकरणामध्ये ७/१२, ६-क, ६-ड, व्हिसेरा अहवाल, पोलीस अंतिम अहवाल इत्यादी कारणांचे कागदपत्रा अभावी विमा प्रकरणे प्रलंबित राहतात, असे निदर्शनास आलेले आहे.

---

## परभणी जिल्ह्यातील रुग्णालये व आरोग्य केंद्रातील रिक्त पदे व सोयी सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत

**(४) ५१३९ (१७-११-२०२०) श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अमोल मिटकरी :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्ह्यातील जिल्हा सामान्य रूग्णालय, उपजिल्हा रूग्णालय, प्राथमिक आरोग्य केंद्रे, ग्रामीण रूग्णालये, महिला रूग्णालये व उपकेंद्र येथे निकषाप्रमाणे पदभरती केली नसल्याने विद्यमान कर्मचारी व यंत्रणा यांना मोठ्या प्रमाणात ताण सहन करावा लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लोकसंख्येच्या प्रमाणात पद निर्मिती व रिक्त पदे भरण्याबाबत तसेच इतर सोयी सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत सार्वजनिक आरोग्य विभागाकडून कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) तसेच, याबाबत तालुकानिहाय थोडक्यात माहिती काय आहे व किती मुदतीत पद भरती व इतर सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (१७-११-२०२१) :** (१) अंशत: होय.

कोविड-१९ साथरोगाच्या पार्श्वभुमीवर आरोग्य सेवेचे सक्षमीकरण करण्याकरीता आरोग्य सेवेतील १०० टक्के सर्व पदे भरण्यास शासनाने दिली असून त्यानुसार भरती प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. त्यामध्ये परभणी जिल्ह्यातील आरोग्य कर्मचारी, अधिपरिचारिका व इतर पदांचा समावेश आहे.

(२) परभणी येथील स्त्री रुग्णालयाचे ६० खाटावरुन १०० खाटांमध्ये दिनांक १७/०१/२०१३ रोजी श्रेणीवर्धन करण्यात आले आहे. तसेच उपजिल्हा रुग्णालय,मानवत येथे ३० खाटांवरुन ५० खाटामध्ये दिनांक १९/०८/२०९ श्रेणीवर्धन करण्यात आले आहे. तर ग्रामीण रुग्णालय, सोनपेठ येथे दिनांक ६/०६/२०१९ रोजी पदनिर्मिती करण्यात आलेली आहे.

सन २००१ च्या लोकसंख्येच्या आधारे बृहत आराखड्यात ८ प्राथमिक आरोग्य केंद्रे, ११ उपकेंद्रे नव्याने मंजूर करण्यात आलेली आहेत. सन २०२० मध्ये विशेष बाब म्हणून तीन प्राथमिक आरोग्य केंद्र व ४ उपकेंद्र मंजूर करण्यात आलेली आहेत. त्याचबरोबर सन २०२१ च्या लोकसंख्येच्या आधारे नवीन संस्था मंजूरीचा बृहत आराखडा तयार करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) परभणी येथे ४०६ खाटांचे जिल्हा रुग्णालय, ६० खाटांचे स्त्री रुग्णालये, ५० खाटांचे अस्थिव्यंगोपचार रुग्णालय, गंगाखेड व सेलू येथे प्रत्येकी ५० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय, पालम, पाथरी, सोनपेठ, बोरी, जिंतूर, मानवत व पूर्णा येथे प्रत्येकी ३० खाटांचे ग्रामीण रुग्णालय कार्यरत आहे. परभणी जिल्हयात गट-अ ते गट-ड संवर्गातील एकूण ८९९ पदे मंजूर असून त्यापैकी ६०९ पदे भरलेली आहेत. तसेच प्राथमिक आरोग्य केंद्रे व उपकेंद्रांचे कामकाज सुरळीत होण्याच्या दृष्टीने राष्ट्रीय आरोग्य अभियानातंर्गत भरण्यात आलेली ए.एन.एम. प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्र स्तरावर रिक्त पदांच्या ठिकाणी नियुक्ती करण्यात आली आहे. आरोग्य विभागाच्या अधिपत्याखालील रिक्त पदे भरण्याची प्रक्रिया सुरु करण्यात आली असून दिनांक २८/०२/२०२१ रोजी झालेल्या सरळसेवा परीक्षेद्वारे ५०% रिक्त पद भरती करण्यात आली आहे व उर्वरित पदे भरण्यासाठी दिनांक २४/१०/२०२१ व दिनांक ३१/१०/२०२१ रोजी पदभरती परीक्षा घेण्यात आली आहे.

तसेच वर्ग-३ व वर्ग-४ च्या नियमित पदभरतीबाबत ग्रामविकास विभागाकडून कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुलुंड (मुंबई) येथील ॲपेक्स रुग्णालयातील जनरेटरने पेट घेऊन अपघात झाल्याबाबत

**(५) ५२२३ (१७-११-२०२०) श्री.महादेव जानकर, श्री.रामनिवास सिंह, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्री.विलास पोतनीस** : सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुलुंड (मुंबई) येथील ॲपेक्स रुग्णालयातील जनरेटरने पेट घेतल्यामुळे दाखल असलेले ११ रुग्णांना गंभीर दुखापत व दोन रुग्ण मृत पावल्याची घटना दिनांक १३ ऑक्टोबर, २०२० रोजी वा त्यासुमारास घडली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर घटना घडण्यामागची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने संबंधित दोषींविरुध्द कारवाई करुन अपघातात मृत पावलेल्यांच्या नातेवाईकांना व जखमींना आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१५-११-२०२१) :** (१) व (२) दिनांक १२/१०/२०२० रोजी सायंकाळी ०५.३० वाजता जनरेटरने पेट घेतल्यामुळे ॲपेक्स रुग्णालयातील वीजपुरवठा खंडीत झाला व त्यावरील उपकरणे लवकरच बंद होण्याची शक्यता लक्षात घेता रुग्णालयात दाखल ३९ रुग्णालयांमध्ये इतर रुग्णालयांमध्ये स्थानांतरीत करीत असताना एक रुग्ण मृत पावला व दुसरा रुग्ण दुसऱ्या दिवशी सकाळी ०८.१५ च्या सुमारास मृत पावला.

तथापि, सदर दुर्घटनेमध्ये रुग्णांना दुखापत झालेली निदर्शनास आली नसल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) सदर प्रकरणी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत नेमण्यात आलेल्या चौकशी समितीच्या अहवालानुसार, ॲपेक्स रुग्णालयाचा नियमित विद्युत पुरवठा खंडीत झाला व पर्यायी वीज पुरवठ्यासाठी बसविलेला विद्युत जनित्र संच हा जुना असल्याने व तो सलग साडेसात तास सुरु असल्यामुळे अधिक गरम होऊन जळला असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

राज्यामध्ये नैसर्गिक आपत्तीच्या घटनांमध्ये बाधित होणाऱ्या व्यक्तींना राज्य आपत्ती प्रतिसाद निधी व केंद्रीय आपत्ती प्रतिसाद निधीमधून दिनांक १३/०५/२०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये निश्चित केलेल्या निकषानुसार व दराने आर्थिक स्वरुपात मदत देण्यात येते. ॲपेक्स रुग्णालयातील दुर्घटनेत मृत पावलेल्यांच्या नातेवाईकांना व जखमींना आर्थिक मदत देण्याबाबतचे प्रवधान त्यामध्ये नसल्याने मदत अनुज्ञेय होत नाही असे मदत व पुनर्वसन विभागाने कळविले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## बीड पंचायत समिती (ता.जि.बीड) मध्ये मनरेगा योजनेच्या कामात गैरव्यवहार झाल्याबाबत

**(६) ७८२० (१६-०३-२०२१) श्री.विनायकराव मेटे : दिनांक १५ डिसेंबर, २०२० रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ७ मधील प्रश्न क्रमांक ५५२६ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बीड पंचायत समिती (ता.जि.बीड) मनरेगा योजनेत सन २०१२-२०१३ ते २०१८-२०१९ मध्ये रुपये १६ ते १७ कोटींची बोगस कामे ऑनलाईन केल्याचे दाखवून गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बीड पंचायत समिती (ता.जि.बीड) मनरेगा योजनेंतर्गत रस्ते बांध-बंदिस्तीची कुशल देयके किती प्रमाणित केली होती, त्याचे मूळ दस्तऐवज तसेच मनरेगा कामासा झालेला खर्च अनुज्ञेय बाबींवर झाला किंवा नाही याची चौकशी व पाहणी गटविकास अधिकारी, पंचायत समिती बीड यांनी केली होती काय, सदरील सर्व कामांचे लेखापरिक्षण संबंधित विभागाने केले आहे काय,
(३) असल्यास, सदर गैरव्यवहाराप्रकरणी ऑपरेटर, एपीओ, इंजिनियर यांच्यावर कारवाई करण्यात आली परंतु याप्रकरणी दोषी ग्रामसेवक, सरपंच, उपअभियंता आणि राजकीय प्रतिनिधी यांच्यावर कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने बीड पंचायत समितीच्या मनरेगा योजनेत गैरव्यवहार करणाऱ्या संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संदीपानराव भुमरे (२५-११-२०२१) :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२), (३) व (४) सदर प्रकरणी संबंधित कामांची पुर्व परवानगी, प्रशासकीय मान्यता, कार्यारंभ आदेश नसताना आणि कुशल देयकांची कोणतेही मूळ अभिलेखे उपलब्ध नसताना संबंधित कर्मचाऱ्यांनी नरेगा संकेत स्थळावर परस्पर कुशल देयके नियमबाहय ऑनलाईन सादर केले असल्याचे आढळून आल्याने संबंधित दोषी कर्मचाऱ्यांची सेवा समाप्त करण्यात आली आहे. व तत्का.गटविकास अधिकारी यांची विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आली आहे.

सदर प्रकरणी बीड पोलीस स्टेशनमध्ये फौजदारी गुन्हा दाखल केलेला आहे. व सदर बाब न्याय प्रविष्ट आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कळंबोली (ता.पनवेल, जि.रायगड) येथे बेकायदेशीरपणे गौण खनिजाची वाहतूक करणाऱ्या वाळू माफियांनी तलाठ्यास मारहाण केल्याबाबत

**(७) ८४५८ (१४-०६-२०२१) डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कळंबोली (ता.पनवेल, जि.रायगड) येथे अनधिकृतपणे गौण खनिजाची वाहतूक करणाऱ्या वाळू माफियांवर कारवाई करण्यास गेलेल्या तलाठ्यास वाळू माफियांनी हल्ला करुन बेदम मारहाण केल्याचे माहे मार्च, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने वाळूचे बेकायदा उत्खनन व वाहतूक करणाऱ्या माफियांविरुध्द गुन्हे दाखल करुन त्यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात (२९-०७-२०२१)** : (१) दिनांक १३/०३/२०२१ रोजी वाळू वाहतूक माफीया यांनी गौण खनिज तपासणी पथकातील तलाठी यांना धक्काबुक्की तसेच नायब तहसिलदार यांना शिवीगाळ केल्याची बाब निदर्शनास आली आहे.
(२) या प्रकरणी चौकशी करुन कळंबोली पोलीस ठाणे येथे भा.दं.वि.सं. कलम ३५३, ३४१, १४३, ५०४, ५०६, १८८, २६९, २७० तसेच महाराष्ट्र कोविड उपाययोजना कलम ११, साथरोग प्रतिबंध अधिनियम १८९७ कलम ३ अन्वये गुन्हा दाखल करुन ८ आरोपींना अटक करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोरोना संसर्गामुळे नागपूरातील शासकीय मनोरूग्णालयातील रूग्णांचे लसीकरण होण्याबाबत

**(८) ८५७९ (१०-०६-२०२१) श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रवीण दटके, श्री.प्रशांत परिचारक, श्री.प्रविण दरेकर** : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोरोना संसर्गामुळे नागपूर येथील शासकीय मनोरूग्णालयातील मनोरूग्णांच्या जीवाला धोका निर्माण झाल्याची बाब माहे एप्रिल, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मनोरूग्णालयातील ४५० पैकी १२५ रूग्णांना कोरोनाची बाधा झाली असून त्यातील ७ जणांचा मृत्यू झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने मनोरूग्णालयातील रूग्णांचे लसीकरण होण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (१६-११-२०२१)** : (१) व (२) माहे एप्रिल, २०२१ मध्ये ४२२ पैकी १६८ मनोरुग्णांना बाधा झाली असून त्यापैकी ५ मनोरुग्णांचा मृत्यू झालेला आहे.

(३) मनोरुग्णांच्या मृत्यूबाबत चौकशी समिती नेमण्यात आली होती. सदर चौकशी समितीच्या अहवालात सदर मनोरुग्णांचा मृत्यू करोना संसर्गामुळे व वार्धक्यामुळे गुंतागुंत निर्माण झाल्यामुळे झाल्याचे नमूद केलेले आहे.
प्रादेशिक मनोरुग्णालय, नागपूर येथील ५५२ मनोरुग्णांचे लसीकरण पूर्ण झालेले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## आटपाडी (जि.सांगली) पोलीस स्टेशनच्या सहायक पोलीस निरीक्षकाच्या गैरकारभाराबाबत

**(९) ८५९४ (१४-०६-२०२१) श्री.गोपिचंद पडळकर :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आटपाडी (जि.सांगली) पोलीस स्टेशन हद्दीत नोटा छपाई मशीन सापडूनही संबंधित आरोपीना सोडल्याप्रकरणी तसेच आटपाडी तहसिल कार्यालयाने जप्त केलेले वाहने संगनमताने चोरी करण्यास मदत केल्याप्रकरणी आटपाडी पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक (API) यांची सी.आय.डी. मार्फत चौकशी करुन त्यांचेवर कारवाई करण्याबाबतची तक्रार एका राजकीय पक्षाचे तालुका अध्यक्ष (जि.सांगली) यांनी जिल्हा पोलीस प्रमुखांकडे माहे फेब्रुवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील (२३-११-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सदर प्रकरणी उपविभागीय पोलीस अधिकारी, विटा विभाग, विटा यांचे स्तरावर चौकशी करण्यात आली आहे.चौकशीअंती आटपाडी (जि.सांगली) पोलीस स्टेशन हद्दीत नोटा छपाई मशीन सापडलेबाबत अथवा संबंधित

आरोपीना सोडल्याची कोणतीही घटना घडल्याचे निष्पन्न झाले नाही. सबब, सहायक पोलीस निरीक्षक (API) यांची कोणतीही कसुरी दिसून आली नसल्याने त्यांचेवर कारवाई करणेत आलेली नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## तलाठी पदाकरीता महापरीक्षा पोर्टलमार्फत घेण्यात आलेल्या ऑनलाईन परिक्षेत बोगस (डमी) उमेदवारांनी परीक्षा दिल्याबाबत

**(१०) ८६४४ (१५-०७-२०२१) श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तलाठी पदाकरीता महापरीक्षा पोर्टलमार्फत दिनांक २ ते २७ जुलै, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान ऑनलाईन झालेल्या परिक्षेमध्ये औरंगाबाद व जालना जिल्ह्यातील ११ बोगस (डमी) उमेदवार आढळून आल्याचे माहे मार्च, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हा निवड समिती सदस्यांनी दिनांक ३ ते ७ जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान गुणवत्ता यादीतील उमेदवारांच्या कागदपत्रांची पडताळणी केली असता काही उमेदवारांनी परीक्षा आवेदनपत्र सादर करतानाचा फोटो, तर काही उमेदवारांनी परीक्षा देताना प्रवेश पत्रावरील फोटो आणि प्रत्यक्षातील उमेदवारांचा फोटा तसेच काहींच्या स्वाक्षऱ्यात तफावत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने बोगस (डमी) उमेदवारांवर कारवाई करुन तलाठी संवर्गातील ८४ जागांकरीता पुन्हा नव्याने परीक्षा घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात (१८-११-२०२१) :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील नागरिकांना प्राथमिक आरोग्य केंद्र, उपकेंद्र अशा आवश्यक आरोग्य संस्था व मनुष्यबळ उपलब्ध करून देण्याबाबत

**(११) ८६७१ (१५-०७-२०२१) डॉ.वजाहत मिर्झा :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आरोग्य संस्थांची संख्या व मनुष्यबळ ही १९९१ च्या लोकसंख्येवर आधारित असल्याने त्याचा आरोग्य व्यवस्थेवर ताण पडत असल्याची बाब माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सन २०११ च्या जनगणनेनुसार व सद्या लोकसंख्येला अनुसरून राज्यातील नागरिकांना प्राथमिक आरोग्य केंद्र, उपकेंद्र अशा आवश्यक आरोग्य संस्था व मनुष्यबळ उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (१६-११-२०२१) :** (१) हे खरे नाही.

सन २००१ च्या लोकसंख्येवर आधारित आरोग्य संस्थाचा बृहतआराखड्याला शासन निर्णय दिनांक १७ जानेवारी, २०१३ व शासन निर्णय दिनांक ०९ जून, २०१४ नुसार मंजूरी देण्यात आली असून राज्यामध्ये नव्याने २७१ प्राथमिक आरोग्य केंद्रे व ९०१ उपकेंद्रे मंजूर करण्यात आली आहेत.तसेच यापुर्वी मंजूर असलेल्या आरोग्य संस्थेच्या कार्यक्षत्रात लोकसंख्येमध्ये वाढ झालेल्या ठिकाणी अतिरिक्त मनुष्यबळ निर्माण करण्यात आले आहे.

(२) सन २०११ च्या लोकसंख्येवर आधारित नव्याने आरोग्य संस्था निर्माण करण्याबाबत जोडबृहतआराखडा तयार करण्याची कार्यवाही आयुक्तालय स्तरावर सुरू आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात बनावट क्रीडा प्रमाणपत्रे मिळवून नोकरी मिळविलेल्या बोगस उमेदवारांचे नियुक्ती पत्र रद्द करुन प्रतिक्षा यादीतील पात्र उमेदवारांची नियुक्ती करण्याबाबत

**(१२) ८६९३ (१४-०६-२०२१) श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.विनायकराव मेटे : तारांकित प्रश्न क्रमांक ७२८३ ला दिनांक ९ मार्च, २०२१ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ट्रॅम्पोलिन व टंबलिग या खेळातील बोगस प्राविण्य प्रमाणपत्राआधारे शासकीय सेवेत भरती झालेल्या उमेदवारांची पात्रता पत्रे रद्द करण्याबाबत व त्यानुषंगाने खेळाडू आरक्षणांतर्गत आरक्षणाच्या जागेवर प्रतिक्षा यादीतील खेळाडूला लाभ देण्याबाबत खेळाडूच्या संबंधित निवड प्राधिकरणास पत्राद्वारे सूचित केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात खेळाडूंनी दाखल केलेल्या रिट याचिकेमध्ये मा.उच्च न्यायालयाने उमेदवारांना प्रथम अपील दाखल करण्याची संधी देण्याबाबत सूचीत केले असून त्यानुषंगाने सुरु असलेली कार्यवाही पूर्ण झाली आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यात बनावट क्रीडा प्रमाणपत्रे मिळवून नोकरी मिळविलेल्या बोगस उमेदवारांचे नियुक्ती पत्र रद्द करुन प्रतिक्षा यादीतील पात्र उमेदवारांची नियुक्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुनिल केदार (२३-११-२०२१) :** (१) होय.

(२) व (३) मा.उच्च न्यायालयाच्या निदेशानुसार, प्रथम अपील दाखल केलेल्या उमेदवारांची सुनावणी घेण्याची कार्यवाही झाली असून उमेदवारांबाबत सुनावणी घेण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच प्रतिक्षायादीतील पात्र उमेदवारांच्या नियुक्तीबाबत संबंधित नियुक्ती प्राधिकरणाकडून कार्यवाही करावयाची आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## परभणी जिल्ह्यातील जलयुक्त शिवार योजनेतून होणाऱ्या कामांची चौकशी करण्याबाबत

**(१३) ८७११ (१७-०६-२०२१) श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे : दिनांक १५ डिसेंबर, २०२० रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ११ मधील प्रश्न क्रमांक ५१४२ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) परभणी जिल्ह्यातील जलयुक्त शिवार योजनेतून मागील चार वर्षात झालेल्या विविध कामांच्या दर्जाची तसेच त्रयस्थ यंत्रणेने केलेल्या कागदोपत्री तपासणीची उच्चस्तरीय चौकशी करण्यात यावी अशी मागणी परभणी येथील सामाजिक कार्यकर्ते यांनी सन २०२० मध्ये वा त्यादरम्यान विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांच्याकडे लेखी निवेदनाव्दारे केली होती, हे खरे आहे काय,

(२) तसेच, उपायुक्त रोहयो यांच्यामार्फत जिल्हाधिकारी, परभणी यांना अहवाल सादर करण्यास होत असलेल्या विलंबाबाबत माहे जून, २०२० च्या दरम्यान पत्रोत्तर करून सूचना देण्यात आली असून मागील चार वर्षात जलयुक्त शिवार योजनेतून झालेली सर्व कामे, त्यांचा दर्जा त्रयस्थ यंत्रणाने केलेली कागदोपत्री तपासणी या सर्वांची जिल्हाधिकारी परभणी यांच्या स्तरावरून चौकशी करण्यात आली आहे काय व याबाबत थोडक्यात व सविस्तर माहिती काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शंकरराव गडाख (०२-१२-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय. अंशत: खरे आहे.

उपआयुक्त (रोहयो) औरंगाबाद यांचे पत्र दिनांक १८/०२/२०२० च्या अनुषंगाने तक्रार अर्जातील नमूद बाबींवर चौकशी करण्यासाठी अपर जिल्हाधिकारी, परभणी यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती गठीत करण्यात आली होती. आता प्रस्तुत प्रकरणी जलयुक्त शिवार अभियान अंतर्गत झालेल्या कामांच्या तक्रारींच्या अनुषंगाने, लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून खुली चौकशी करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील कृषी विद्यापीठातील प्राध्यापक व इतरांना नियमबाह्यरित्या जादा वेतन अदा केल्याबाबत

**(१४) ८७२७ (१४-०६-२०२१) श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कृषी विद्यापीठातील सहाय्यक प्राध्यापक व इतरांना नियमबाह्यरित्या जादा वेतन वितरित करुन कोट्यवधी रुपयांच्या गैरप्रकार प्रकरणी संबंधीताकडून वसूली करण्याचे आदशे शासनाने सन २०१९-२०२० मध्ये वा त्यादरम्यान काढण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने पत्र क्र.संकीर्ण/१५१७/प्र.क्र.४९७/६-अे, दिनांक ६ फेब्रुवारी, २०२० प्रमाणे सर्व विद्यापीठांना चौकशी, कारवाई व माहितीबाबतचे आदेश देण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने प्राध्यापक व इतरांकडून वसूली करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, याबाबत थोडक्यात सविस्तर माहिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (१२-११-२०२१) :** (१) होय, खरे आहे. राज्यातील कृषी विद्यापीठांतील शिक्षकवर्गीयांना ६ व्या वेतन आयोगात केल्या गेलेल्या अतिप्रदानाची वसुली करण्याबाबतचा शासन निर्णय दिनांक २४/०८/२०१८ रोजी निर्गमित करण्यात आला आहे.

(२) अंशत: खरे आहे.

(३) राज्यातील कृषी विद्यापीठातील शिक्षकवर्गीयांना ६ व्या वेतन आयोगात झालेल्या अतिप्रदानाची वसुली करण्याबाबतच्या दिनांक २४/०८/२०१८ च्या शासन निर्णयाविरोधात मा.उच्च न्यायालयाच्या विविध खंडपीठात संबंधित शिक्षकवर्गीयांकडून रिट याचिका दाखल करण्यात आल्या आहेत. रिट याचिकांच्या सुनावणीदरम्यान मा.न्यायालयाने शासन निर्णय दिनांक २४/०८/२०१८ नुसार अतिप्रदानाची वसुली करण्यास अंतरिम स्थगिती दिली आहे. सद्य:स्थितीत सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मराठवाड्यातील वृक्ष लागवड योजनेत गैरव्यवहार झाल्याबाबत

**(१५) ८७३१ (११-०६-२०२१) श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाड्यात वृक्ष लागवड योजनेसाठी गत चार वर्षात कोटयवधी रूपयांचा खर्च होवूनही प्रत्यक्षात २५ टक्के पेक्षाही कमी प्रमाणात वृक्ष संगोपन व वृक्ष संवर्धन झाल्यामुळे वृक्ष लागवड योजनेची शासनस्तरवरून चौकशी करण्यात यावी अशी मागणी परभणी येथील सामाजिक कार्यकर्ते यांनी मा.वने मंत्री यांचेकडे सन २०२१ मध्ये वा त्यादरम्यान ई-मेलव्दारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तत्कालीन वने मंत्री यांनी माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान सर्व विभागांच्या प्रधान सचिव यांना विशेष पत्र लिहून ८० ते ९० टक्के वृक्ष संवर्धन व संगोपन करण्याबाबतच्या लेखी सूचना केल्या होत्या, तसेच, विभागीय आयुक्त कार्यालय, रोहयो व उपजिल्हाधिकारी रोहयो यांनी वृक्ष संवर्धन कक्ष स्थापन करून कार्यवाही करण्याबाबतची जबाबदारी निश्चित केली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन वृक्ष लागवड प्रकरणी अपयशास कारणीभूत असणाऱ्या सर्व विभाग प्रमुख, अधिकारी व यंत्रणा यांची चौकशी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, त्याबाबत थोडक्यात सविस्तर माहिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उध्दव ठाकरे (२३-११-२०२१) :** (१) हे खरे नाही.

(२) होय, हे खरे आहे.

(३) मा.श्री.दत्तात्रय भरणे, राज्यमंत्री (वने) यांच्या अध्यक्षतेखाली "राज्यात ३३ कोटी वृक्ष लागवडीसाठी राबविण्यात आलेल्या विशेष मोहिमेबाबत" या विषयावरील तदर्थ समितीचे गठन करण्यात आले आहे. सदर समिती मार्फत चौकशीबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्नच उद्भवत नाही.

---

## आरमोरी (जि.गडचिरोली) येथे तालुका लघु पशुवैद्यकीय चिकित्सालय सुरु करण्याबाबत

**(१६) ८८२५ (१५-०७-२०२१) श्री.रामदास आंबटकर, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आरमोरी (जि.गडचिरोली) येथे तालुका लघु पशुवैद्यकीय चिकित्सालय नविन इमारत बांधकाम करण्यात येवून कोट्यवधी रुपयांच्या मशीन खरेदी करुनही त्याचे उद्घाटन न झाल्याने मशीन विनावापर पडून असल्याचे दिनांक २५ एप्रिल, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन पशुवैद्यकीय चिकित्सालय सुरु करण्याबाबत व पशुचिकित्सालयातील रिक्त तज्ञ पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुनिल केदार (२४-११-२०२१) :** (१) तालुका लघु पशुवैद्यकिय सर्वचिकित्सालय माहे सप्टेंबर, २०२० मध्ये इमारतीत स्थलांतरित करण्यात आले आहे.

तालुका लघु पशुवैद्यकिय सर्वचिकित्सालय, आरमोरी येथील जुनी इमारत जीर्ण झाल्यामुळे, तसेच पुरेशी जागा उपलब्ध नसल्यामुळे पशुरोग निदानासाठी आवश्यक उपकरणे वापराअभावी पडून राहू नयेत यासाठी उपकरणांपैकी काही उपकरणे दिनांक ३०/११/२०१२ ते २४/०२/२०१५ या कालावधीकरीता नागपूर पशुवैद्यक महाविद्यालय यांचेकडे हस्तांतरीत करण्यात आली होती. तेथे त्यांचा वापर पशुरोग निदानसाठी करण्यात आल्यामुळे पशुपालकांना सेवा उपलब्ध झालेल्या आहेत.तद्नंतर सदरची उपकरणे तालुका लघु पशुवैद्यकी सर्वचिकित्सालय, आरमोरी या संस्थेकडे परत आणण्यात आली. जुन्या इमारतीमध्ये जागे अभावी क्षकिरण यंत्र पुरवठादाराकडून कार्यान्वित करणे शक्य न झाल्याने त्याचा वापर झालेला नाही. नवीन इमारतीमध्ये सदरचे यंत्र कार्यान्वित करण्यासाठी कार्यवाही चालू आहे. तालुका लघु पशुवैद्यकी सर्वचिकित्सालय, आरमोरी नवीन इमारतीमध्ये

स्थलांतरीत झाल्यानंतर क्ष किरण सयंत्र वगळता सोनोग्राफी मशिनसह इतर सर्व उपकरणे माहे एप्रिल,२०२१ पासून चालू स्थितीत आहेत.

(२) सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन, हे रिक्त पद पदोन्नतीने भरण्याबाबत कार्यवाही सुरू आहे. तसेच पशुधन विकास अधिकारी यांची ४३२ पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून शिफारसप्राप्त उमेदवारांमधून सत्वर भरण्याचे संकल्पित आहे. वरिष्ठ लिपिक हे पद पदोन्नतीने भण्याबाबतची कार्यवाही आयुक्त पशुसंवर्धन, कार्यालयाच्या स्तरावर आहे. उर्वरीत व्रणोपचारक व परिचर ही पदे भरण्याबाबतची कार्यवाही प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन, नागपूर यांच्या स्तरावरुन सुरू आहे

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पाथरी ढालेगाव (ता.पाथरी, जि.परभणी) या चेक पोस्टवर शिक्षकास मारहाण झाल्याबाबत

**(१७) ८८३९ (१५-०७-२०२१) श्री.नागोराव गाणार, डॉ.रणजित पाटील :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाथरी ढालेगाव (ता.पाथरी, जि.परभणी) या चेक पोस्टवर शिक्षक श्री.बाळीराम मोकींदा चव्हाण व श्री.गजमल हे दिनांक २८ एप्रिल, २०२१ रोजी रात्री १० ते सकाळी ६ या वेळेत राष्ट्रीय कर्तव्य बजावत असताना रात्री १२ वाजताचे सुमारास पाथरीचे नायब तहसिलदार श्री.कट्टे हे नशा करुन काही गावगुंडासह चेकपोस्टवर येवून त्यांनी शिक्षक श्री.बळीराम चव्हाण यांना अर्वाच्च भाषेत शिवीगाळ करुन काठीने मारहाण केल्याची घटना माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी नायब तहसिलदार यांना सेवेतून बर्डतर्फ करुन त्यांचेवर फौजदारी गुन्हा दाखल करण्याची तक्रार नागपूर विभागाचे शिक्षक लोकप्रतिनिधींनी दिनांक ३ मे, २०२१ रोजी मा.मुख्यमंत्री व स्थानिक प्रशासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील (२२-११-२०२१) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) उक्त प्रकरणी उपविभागीय अधिकारी, पाथरी यांनी संबंधितांची चौकशी केली असता नायब तहसिलदार, पाथरी यांनी संबंधित शिक्षकांची जाहीर माफी मागितली असल्याने तक्रारदार यांनी तक्रार आपआपसात मिटवून घेतली. त्यामुळे उपविभागीय अधिकारी, पाथरी यांनी उक्त तक्रार निकाली काढण्यात यावी यासाठी जिल्हाधिकारी, परभणी कार्यालयास अहवाल सादर केला असता, जिल्हाधिकारी, परभणी यांच्या कार्यालयाकडून नायब तहसिलदार, पाथरी यांना सदर प्रकार पुन:श्च होणार नाही याची दक्षता घ्यावी अशी नोटीस दिली.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## लोखंडी सावरगाव (ता.अंबेजोगाई, जि.बीड) येथे वृध्दत्व आरोग्य व मानसिक आजार केंद्रात रिक्त पदे भरुन वैद्यकीय साहित्य, मशनरीसह इतर भौतिक सोई सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(१८) ८९१५ (१८-०६-२०२१) श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोखंडी सावरगाव (ता.अंबेजोगाई, जि.बीड) येथे वृध्दत्व आरोग्य व मानसिक आजार केंद्र मंजूर असून ते अद्याप कार्यान्वित झाले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या केंद्रासाठी वैद्यकीय अधिकाऱ्यासह वर्ग-१ ते ४ ची १२६ पदे मंजूर असून ती रिक्त असून सिटी स्कॅन मशीन, रुग्णवाहिका, शववाहिका व एक्सरे मशीन खरेदी करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर केंद्रात रिक्त पदे भरण्याबाबत व वैद्यकीय साहित्य, मशनरीसह इतर भौतिक सोई सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (१६-११-२०२१) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) हे अंशत: खरे आहे.

१२९ मंजूर पदांपैकी ३३ पदे भरली असून उर्वरीत ९६ पदे भरण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे. रुग्णवाहिका व एक्स रे मशीन उपलब्ध असून उर्वरीत यंत्रसामग्रीची खरेदी प्रक्रिया सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## रेवदंडा थेरोंडा (ता.अलिबाग, जि.रायगड) समुद्रकिनाऱ्यावरील स्थानिक व्यावसायिकांच्या जमिनींवर कारवाई केल्याबाबत

**(१९) ८९८६ (१५-०७-२०२१) श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रविण दरेकर, श्री.नागोराव गाणार, डॉ.परिणय फुके, श्री.प्रसाद लाड, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रेवदंडा थेरोंडा (ता.अलिबाग, जि.रायगड) समुद्रकिनाऱ्यावर पर्यटनासाठी सुविधा पुरविणाऱ्या स्थानिक व्यावसायिकांना मदत न करता त्यांनी पर्यटनासाठी अतिक्रमित केलेल्या जमिनीवर उभारण्यात आलेल्या कॅम्प्स टेन्टवर शासनाने कारवाई केली असल्याचे माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने स्थानिक व्यावसायिकांच्या जमिनींवर कारवाई करणाऱ्या दोषी अधिकारी व कर्मचारी यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात (१८-१०-२०२१) :** (१), (२) व (३) माहे मे, २०२१ वा त्यादरम्यान अशी कार्यवाही करण्यात आलेली नाही, मात्र मौजे रेवदंडा ता.अलिबाग, जि.रायगड, स.नं.१२२/१/१अ/१अ/१ या गुरचरण जमीन तसेच मळई जमिनीवर अतिक्रमण केल्याबाबत उपविभागीय अधिकारी, अलिबाग यांचेकडे तक्रार दाखल केली होती. तत्कालीन परि.सहाय्यक जिल्हाधिकारी तथा उपविभागीय अधिकारी अलिबाग यांचे अध्यक्षतेखाली दिनांक २०/०२/२०२१ रोजी स्थळपहाणी केली असता विषयांकित शासकीय गुरचरण व

मळई जमिनीवर कच्ची/पक्की बांधकामे, पर्यटकांसाठी टेन्ट उभारुन त्यामध्ये अनधिकृतरित्या गॅस सिलेंडरचा वापर, अन्न व औषध विभागाची परवानगी न घेता पर्यटकांची केलेली जेवणाची व्यवस्था, अवैध वीज जोडणी करुन त्या ठिकाणी रोषणाई करणे, पाणीपुरवठा करणेसाठी अवैध नळ जोडणी करणे, लाऊड स्पिकरचा वापर करणे तसेच मद्य विक्री होत असल्याचे निदर्शनास आल्याने दिनांक २६/०२/२०२१ रोजी सदर ठिकाणी असलेली अतिक्रमणे निष्काषित करण्यात आली आहेत. शासकीय जमिनीवरील अतिक्रमणे निष्कासित करण्यात आलेली असल्यामुळे अधिकारी व कर्मचारी यांचेविरुध्द कारवाई करणेचा प्रश्न उद्भवत नाही.

---

## सोलापूर जिल्हयातील पंतप्रधान आवास योजनेंतर्गत कामे संथगतीने सुरु असल्याबाबत

**(२०) ९००१ (११-०६-२०२१) श्री.प्रशांत परिचारक** : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्हयातील एकूण १० नगरपरिषद, ०१ महानगरपालिका व ०२ नगरपंचायतीमधील १७०७२ लोकांना सन २०२२ पर्यंत प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत पक्की घरे देण्याचे उद्दिष्ट पूर्ण करणार असे आश्वासन शासनामार्फत देण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्थानिक जिल्हा प्रशासनाच्या निष्क्रियतेमुळे १७०७२ घरांपैकी केवळ २००० घरकुलांची कामे पूर्ण झाली असून उर्वरित १५०७२ लोकांना आजही झोपडीतच रहावे लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी जबाबदार मुख्याधिकारी, स्थानिक जिल्हा प्रशासन अधिकारी व जिल्हाधिकारी यांच्या निष्क्रियतेमुळे संथगतीने सुरु असलेली प्रधानमंत्री आवास योजनेचे काम पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. जितेंद्र आव्हाड (३०-११-२०२१) :** (१) प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत सोलापूर जिल्ह्यासाठी एकूण ५३,३७६ घरकुलांचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे.

(२) व (३) सोलापूर जिल्ह्यातील १२ स्थानिक स्वराज्य संस्था क्षेत्रात प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत एकूण ६०,६६७ घरकुलांना केंद्रीय मान्यता व संनियंत्रण समितीने (CSMC) माहे जुलै, २०२१ पर्यंत मंजूरी दिली आहे. सदर घरकुलांपैकी १३२६ घरकुले पूर्ण झाली असून, ६११७ घरकुले प्रगतीपथावर आहेत. प्रकल्प वेळेवर पूर्ण करणेबाबत सुकाणू अभिकरण म्हाडामार्फत पाठपुरावा करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुर्तिजापुर (जि.अकोला) तालुक्यातील उमा बॅरेज प्रकल्पाचे काम पूर्ण करण्याबाबत

**(२१) ९००३ (१०-०६-२०२१) श्री.गोपिकिशन बाजोरीया :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुर्तिजापुर (जि.अकोला) तालुक्यातील उमा बॅरेज प्रकल्पास विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर निर्णय क्र. विपाविम/कातां-५/२८२३/२००७, दिनांक ३१/०८/२००७ अन्वये एकूण रूपये ७८६१.५१ लक्ष किंमतीस प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली असून प्रकल्पाचे सिंचन क्षेत्र ५५१० हेक्टर आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उमा बॅरेज प्रकल्पाचे काम सन २००९ पासून सुरू झाले असून सदर प्रकल्पास विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर निर्णय क्र.विपाविम/कांता-७/२७०३/२०११, दिनांक ३१/०३/२०११ अन्वये एकूण रुपये २३,७२३.५९ लक्ष किंमतीस प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यता प्रदान करुन व्दितीय सुधारित मान्यता प्रस्ताव (किंमत रुपये ७०,२१३.२१ लक्ष) राज्य/तांत्रिक सल्लागार समिती, नाशिक यांना सादर केला असून त्यांचे पत्र दिनांक २०/०१/२०२१ मधील मुद्यांचे अनुपालन क्षेत्रियस्तरावर सुरू आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उमा बॅरेज प्रकल्पाच्या धरणाचे मातीकाम, बॅरेज जॅकवेल, रायझींग मेन, डिलेव्हरी चेंम्बर्स व इतर संलग्न कामाच्या कंत्राटाची निविदा किंमत रुपये ८,४२४.२६ लक्ष असून सदर निविदा मे.वैष्णवी कंस्ट्रक्शन ॲण्ड टी.बी.आर. इन्रा निप्रोजेक्टि प्रा.लि., नागपूर यांना २२.२२% अधिक दराने म्हणजे रुपये ८,३०१.११ लक्ष व मुल्य वृध्दी व रक्कम रुपये ९९८.३६ लक्ष असे एकूण ९,२९९.४७ लक्ष अदा करण्यात आले असून आजपर्यंत बाकी धरणाचे ९०% व संधानक बॅरेजचे ५०% काम पूर्ण झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकल्पास निधीची तरतूद असतानादेखील प्रकल्पाचे काम शासकीय अधिकाऱ्यांनी कंत्राटदाराकडून पूर्ण करुन न घेण्याची कारणे काय आहेत,

(५) असल्यास, उमा बॅरेजच्या सरळ उचलपध्दतीच्या व्दारांची निर्मिती व उभारणीचे कामाचे कंत्राट मे.टी.एन.आर. इन्फ्रा स्ट्रक्चर यांना देण्यात आले असून सदर कामाच्या निविदेची रक्कम रुपये १,५४३.७३ लक्ष असून कंत्राटदारास ४.९५% अधिक दराने म्हणजे रुपये १,६२०.१५ लक्ष इतकी आहे. कंत्राटदारास चौथे देयकान्वये आजपर्यंत कामांतर्गत रुपये १३८९.८० लक्ष व मुल्य वृध्दी रक्कम रुपये १३८.१७ लक्ष असे एकूण रुपये १५२७.९७ लक्ष अदा करण्यात आले असून कंत्राटदारास अदा करण्यात आलेल्या रक्कमेच्या मोबदल्यात प्रकल्प स्थळी व्दार उभारणीच्या कामास अद्यापपर्यंत सुरुवात झालेली नाही, तसेच, मे.टी.एन.आर. इन्फ्रा स्ट्रक्चर यांनी रुपये १५२७.९७ लक्षची उचल करून काम बंद ठेवल्यामुळे सदर निविदा माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये रद्द केली असून मे.टी.एन.आर. इन्फ्रा स्ट्रक्चर यांना देयके अदा करण्याची कारणे काय आहेत,

(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने दोषी अधिकाऱ्यांविरुध्द कारवाई करुन उमा बॅरेज प्रकल्पाचे काम पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच, सदर प्रकल्पाचे काम पूर्ण होण्यास किती कालावधी लागणार आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयंत पाटील (१७-११-२०२१) :** (१) होय.

(२) होय.

(३) होय.

(४) प्रकल्पावर प्रथम मंजूर सुप्रमा मान्यतेपेक्षा जादा खर्च होत असल्याने व्दितीय सुप्रमा मान्यतेशिवाय प्रकल्पावर खर्च करणे शक्य नाही. तसेच कंत्राटदाराने माहे जुलै-२०१२ पासून काम बंद ठेवल्याने सदर कंत्राटदारावर दंडात्मक कार्यवाही करुन महामंडळाच्या दिनांक १२/०५/२०१७ रोजीच्या सहमतीनंतर दिनांक २३/०८/२०१७ अन्वये करारनामा विखंडीत करण्यात आला आहे.

(५) अंशत: खरे आहे. ऑक्टोबर, २०१० ते जून, २०१२ या कालावधीत मंजूर देयकानुसार कामाची अदायगी म्हणुन रुपये १५२७.९७ लक्ष एवढया रकमेचे देयक कंत्राटदारास अदा केले आहे.

(६) विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर यांचे पत्र दिनांक १२/०५/२०१७ व कायदे सल्लागार, विपाविम यांचे दिनांक १९/०५/२०१७ चे निर्देशान्वये उपरोक्त प्रकरणी मा.जिल्हा न्यायालय, अकोला येथे वरील दोन्ही करारनाम्याबाबत कंत्राटदार व अपचारी अधिकारी यांचे विरुध्द दिवाणी दावा दाखल असून प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. तसेच सदर उमा बॅरेज प्रकरणी उघड चौकशीबाबत लाचलुचपत विभाग, अकोला मार्फत उघड चौकशी करण्यात आलेली असून संबंधित कंत्राटदार व अपचारी अधिकारीविरुध्द पोलीस स्टेशन सिव्हील लाईन, अकोला येथे दिनांक १२/०२/२०२० रोजी FIR दाखल करण्यात आला आहे. सद्य:स्थितीत प्रकल्पाचा रुपये ७०२.१३ कोटी किंमतीचा व्दितीय सुप्रमा प्रस्ताव SLTAC, नाशिक स्तरावर तपासणीकरीता असून प्रकल्पास शासनस्तरावरुन सुप्रमा प्राप्त झालेनंतर प्रकल्पाचे उर्वरीत कामाची निविदा काढून प्रकल्पाचे काम जून २०२४ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजित आहे.

---

## सोलापूर जिल्ह्यात ग्रामीण भागातील प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रात अनुपस्थित राहणाऱ्या वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कारवाई करुन वैद्यकीय उपकरणे, औषधांचा पुरवठा व इतर सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(२२) ९०४० (१७-०६-२०२१) श्री.प्रशांत परिचारक :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्ह्यात ग्रामीण भागातील प्राथमिक आरोग्य केंद्रात वैद्यकीय अधिकारी, प्रशिक्षित कर्मचाऱ्यांचा अभाव, अपुरी वैद्यकीय उपकरणे, अल्प औषधांचा पुरवठा व अपुऱ्या सोयी सुविधा असल्यामुळे अनेक प्राथमिक आरोग्य केंद्र पूर्ण क्षमतेने कार्यान्वित नसल्याचे माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ग्रामीण भागातील प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रांसाठी नियुक्त करण्यात आलेले वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी हे त्यांना नेमून दिलेल्या वेळेत कर्तव्यावर उपस्थित रहाणे बंधनकारक असतानाही बहुतांश वेळा अनुपस्थित असल्याने ग्रामीण भागातील जनतेला शहरी भागातील रुग्णालयांवर अवलंबून राहावे लागत असल्याने व वेळेवर प्राथमिक उपचार मिळत नसल्यामुळे नागरिकांना आपले प्राण गमवावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने ग्रामीण भागातील प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रात अनुपस्थित राहणाऱ्या वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कारवाई करुन वैद्यकीय उपकरणे, औषधांचा पुरवठा व इतर सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (२६-११-२०२१) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रातील वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांच्या उपस्थितीबाबत चौकशी करुन अहवाल सादर करण्याबाबत जिल्हा आरोग्य अधिकारी जिल्हा परिषद सोलापूर यांना सुचना देण्यात आलेल्या आहेत.

प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्र स्तरावर आवश्यक वैद्यकीय उपकरणे व औषधी उपलब्ध आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अमरावती जिल्ह्यात सिलिंग व भोगवटादार वर्ग-२ च्या अनामत रकमेचा भरणा न करता गैरप्रकारे विक्री परवानगी दिल्याबाबत

**(२३) ९०७५ (१४-०६-२०२१) श्री.प्रवीण दटके, श्री.प्रविण दरेकर, श्री.नागोराव गाणार, श्री.निलय नाईक, डॉ.परिणय फुके, श्री.प्रशांत परिचारक, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.रमेश कराड, श्री.गोपिचंद पडळकर : तारांकित प्रश्न क्रमांक ७३०० ला दिनांक २ मार्च, २०२१ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती जिल्ह्यात सिलिंग व भोगवटादार वर्ग-२ च्या अनामत रकमेचा भरणा न करता दर्यापूर उपविभागीय अधिकारी (एसडीओ) यांनी विक्री परवानगी दिल्याने शासनाचा कोट्यवधी रुपयांचा महसूल बुडाल्याचे माहे जानेवारी, २०२१ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपविभागीय अधिकारी, दर्यापूर, जि.अमरावती या कार्यालयाचे दफ्तर तपासणीवेळी फक्त सिलिंग जमिनीच्या विक्री परवानगी बाबतची १५ प्रकरणे आढळून आली त्यापैकी ७ प्रकरणांची रक्कम वसुल करण्यात आली असून उर्वरित ८ प्रकरणामध्ये प्रकरणामध्ये रक्कम रुपये २१,१२,४५३/- इतक्या रकमेच्या वसुली अद्याप करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी गैरव्यवहार करणाऱ्या दोषी तत्कालिन उपविभागीय अधिकारी, दर्यापूर यांचेवर शासनाने कोणतीही कारवाई केली नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने गैरप्रकाराने विक्री परवानगी देऊन शासनाचा महसूल बुडविणाऱ्या दोषी अधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करुन सदरहू महसूल वसूल करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात (२९-११-२०२१) :** (१), (२) व (३) अमरावती जिल्ह्यातील सिलिंग जमिनीच्या विक्री परवानगी बाबतची एकूण १५ प्रकरणे आढळून आली. त्यापैकी ७ प्रकरणांची रक्कम वसूल करण्यात आली आहे. उर्वरित ८ प्रकरणांपैकी ६ प्रकरणांची एकूण रक्कम रुपये १२,७०,२१०/- चलनाद्वारे भरणा करण्यात आली असून २ प्रकरणात खरेदी विक्रीचा व्यवहार झालेला नसल्याने सदर दोन्ही आदेश रद्द करण्यात आले आहेत. त्यामुळे सदर २ प्रकरणातील एकूण रक्कम रुपये ८,४२,२४३/- भरणा करुन घेण्याची आवश्यकता नाही.

(४) या प्रकरणी चौकशीअंती उपविभागीय अधिकारी, दर्यापूर यांना महसूल व वन विभागाच्या दिनांक २८/०४/२०२१ च्या आदेशान्वये निलंबित करण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पंचायत समितीना निधी उपलब्ध करुन अधिकाराचा लाभ देण्याबाबत

**(२४) ९२०२ (१५-०७-२०२१) श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा परिषद व ग्रामपंचायतीच्या तुलनेत पंचायत समित्यांना कमी महत्व आहे तसेच, पंचायत समितीचा स्वतंत्र कायदा नसल्याने त्या महाराष्ट्र जिल्हा परिषद, पंचायत समिती अधिनियम, १९६१ या एकाच कायद्यांतर्गत समाविष्ट आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्रीय वित्त योजनेतून सन २०१५ ते २०२० या कालावधीत चौदाव्या वित्त योजनेतून रुपये १५ हजार कोटी अनुदान फक्त ग्रामपंचायतीलाच चिन्हांकित केले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्हा परिषदेला मिळणाऱ्या निधीतून काही भाग पंचायत समितींना द्यावा असे पाचव्या राज्य वित्त आयोग २०१९ च्या अहवालात नमुद करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने जिल्हा परिषद व पंचायत समितींना निधी उपलब्ध करुन अधिकाराचा लाभ देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (१५-११-२०२१) :** (१) ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांच्या त्रिस्तरीय रचनेत जिल्हा परिषद व ग्रामपंचायत यातील दुवा पंचायत समिती आहे. महाराष्ट्र राज्यामध्ये पंचायत समितीची स्थापना महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ अन्वये करण्यात आली आहे.

(२) केंद्र शासनाच्या १४ व्या केंद्रीय वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार व मार्गदर्शक सूचनांनुसार सन २०१५ ते २०२० या कालावधीत वित्त मंत्रालयाकडून प्राप्त झालेले १००% अनुदान रुपये १३८२६.९६ कोटी व व्याजाची रुपये १.८७ कोटी इतकी रक्कम असे एकूण रुपये १३८२८.८३ कोटी इतक्या निधीचे केंद्र शासनाच्या निकषांप्रमाणे महाराष्ट्र राज्यातील ग्रामपंचायतींना वितरण करण्यात आले होते.

(३). जि.प. आणि पं.स. कायदा, १९६१ मधील कलम १५८ अंतर्गतच्या मुंद्रांक शुल्कातील १ % हिस्सा वाटपाच्या सूत्रामध्ये सुधारणा करण्याची शिफारस ५ व्या राज्य वित्त आयोगाने केली आहे.वित्त विभागाने उपलब्ध करून दिलेल्या “५ व्या महाराष्ट्र राज्य वित्त आयोगाचा अहवाल” पुस्तिकेतील परिशिष्ट “ब” मधील अ.क्र.३ शिफारस क्र/०६/१०.२(फ) विद्यमान हिस्सा वाटपातील ०.५०% जिल्हा परिषदेला आणि ०.५० % ग्राम पंचायतीला हे सूत्र बदलून, ०.२५ % जिल्हा परिषदेला, ०.२५ % पंचायत समितीला, ०.२५ ग्रामपंचायतीला आणि ०.२५ राज्य स्तरावर संकोषित करुन सर्व ग्रामपंचायतींना वितरीत करण्यासाठी संकलित करण्याची शिफारस केली आहे. या सुधारीत सूत्रामुळे पंचायत समित्यांना ०. २५% प्राप्ती होणार आहे.

(४) केंद्र शासनाच्या १५ व्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार वित्तीय वर्ष २०२०-२१ मध्ये बंधित अनुदान (Tied Grants) व अबंध अनुदान (Untied Grants) च्या पहिल्या हप्त्यापोटी प्राप्त झालेल्या अनुदानापैकी १०% अनुदान जिल्हा परिषदांना, १० % अनुदान पंचायत समित्यांना व ८०% अनुदान ग्रामपंचायतींना केंद्रशासनाने निश्चित केलेल्या निकषांनुसार ग्रामविकास विभागाच्या जून व जुलै, २०२० मधील शासन निर्णयान्वये तसेच दुसऱ्या हप्त्याची अबंध अनुदानापोटी प्राप्त झालेली रक्कम रुपये १४५६.७५ कोटी ग्रामविकास विभागाच्या दिनांक ०८/०२/२०२१ च्या शासन निर्णयान्वये वितरित करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबई उपनगरातील गोरेगाव (पूर्व) येथील आरे परिसरात वारंवार आगी लागण्याच्या घटना घडत असल्याबाबत

**(२५) ९२८२ (१८-०६-२०२१) श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अमोल मिटकरी, श्री.सतिश चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अनिकेत तटकरे, श्री.संजय दौंड, श्री.अरुण लाड, श्री.अरुणकाका जगताप, श्री.नागोराव गाणार, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रवीण दटके, डॉ.परिणय फुके, श्री.रमेशदादा पाटील, श्री.रमेश कराड, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.रामनिवास सिंह, श्री.प्रशांत परिचारक :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उपनगरातील गोरेगाव (पूर्व) येथील आरे परिसरातील ८०० एकर जागा शासनाने जंगल क्षेत्र म्हणून घोषित केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जंगल क्षेत्रातील आरे कॉलनी व चित्रनगरी येथील परिसरात माहे फेब्रुवारी ते १५ मार्च, २०२१ या कालावधीत १५ हून अधिक वेळा तर विहारलेक रोड, युनिट नंबर १६, आरे डेअरी, मेट्रो कारशेड यासह अन्य लगतच्या परिसरात आकस्मिक आगी लागल्याच्या घटना घडल्याचे दिनांक २७ मार्च, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आरे हे मुंबई शहरात वसलेले एकमेव जंगल असून मिठी आणि ओशिवरा या दोन नद्यांचे मूळ स्त्रोत व जैवविविधतेचे माहेरघर असून उक्त ठिकाणी गत महिनाभरात आगी लागण्याचे प्रमाण लक्षात घेता आग लावून जंगले नष्ट करुन तेथील जमिनीवर अतिक्रमण करुन ती विकासकाला मिळण्याकरीता षडयंत्र रचले जात असल्याबाबतच्या अनेक तक्रारी प्राप्त झाल्यामुळे उक्त प्रकरणी सविस्तर चौकशी करण्यात यावी अशी मागणी लोकप्रतिनिधीसह सर्व नागरीकांनी जाहीररित्या केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने आरे येथील वन्यक्षेत्राच्या सुरक्षेसाठी तसेच जंगल नष्ट होऊ नये याकरीता अग्नि व्यवस्थापन योजना राबविण्याबाबत त्याचबरोबर तेथे पूर्वी असलेले अग्निशमन केंद्र पुन्हा

कार्यान्वित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच आरे येथील जंगलात वारंवार आगी लागण्यास जबाबदार असणाऱ्या दोषींवर कोणत्या स्वरुपाची कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उध्दव ठाकरे (०१-१२-२०२१) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) आगी लावून जंगले नष्ट करुन जमिनीवर अतिक्रमण करुन ती विकासकाला देण्याकरीता कोणतेही षडयंत्र रचले गेलेले नाही. मात्र याबाबत स्थानिक आमदार महोदय/लोकप्रतिनिधींनी चौकशी करण्याबाबतची मागणी केली होती. त्यानुसार मा.लोकप्रतिनिधींना कळविण्यात आलेले आहे.
(४) आरे दुग्ध वसाहतीच्या वनक्षेत्राच्या सुरक्षेसाठी अग्नी व्यवस्थापन योजना राबविण्याबाबत आरे दुग्ध वसाहत परिसरामध्ये बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत अग्निशमन केंद्र सुरु करणेच्या अनुषंगाने महानगरपालिकेच्या स्तरांवरुन नियमानुसार पुढील योग्य ती कार्यवाही करणेबाबत उप मुख्य अग्नीशमन अधिकारी (आर-३), अंधेरी (पूर्व), मुंबई यांच्या कार्यालयास कळविण्यात आलेले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात कपाशी बियाणांमध्ये सुधारणा करण्याबाबत

**(२६) ९४७७ (१३-०७-२०२१) डॉ.सुधीर तांबे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जयंत आसगावकर, श्री.अभिजित वंजारी, श्री.विक्रम काळे, श्री.बाळाराम पाटील, श्री.सतिश चव्हाण, श्री.किशोर दराडे :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात कपाशीचे वारंवार तेच बियाणे वापरल्यामुळे बोंडआळी या किडीच्या प्रादुर्भावामुळे गत २-३ वर्षापासून उत्पादनामध्ये ५०% घट होत असल्याने शेतकऱ्यांचे नुकसान होत असल्याचे माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कपाशी बियाणांमध्ये सुधारणा (मॉडिफिकेशन) करण्याबाबत संबंधित कंपन्यांना सूचना देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (१२-११-२०२१) :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील नगरपालिकेच्या आस्थापना खर्चाची मर्यादा कमी असल्याबाबत

**(२७) ९४९१ (१६-११-२०२१) डॉ.सुधीर तांबे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.विक्रम काळे, श्री.बाळाराम पाटील, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील नगरपालिकेच्या आस्थापना खर्चाची मर्यादा ब-वर्ग नगरपालिकेसाठी ५५% व क-वर्ग नगरपालिकेसाठी ६०% ठरवून दिलेली असल्यामुळे व नगरपालिकेचा खर्च सद्य:स्थितीत जास्त असल्याने अनुकंपा तत्त्वावरील लाभार्थ्यांना लाभ देणे शक्य होत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अनुकंपा तत्त्वावरील लाभार्थ्यांना लाभ देण्याकरीता नगरपालिका अस्थापना खर्चाची अट शिथिल करण्याबाबत शासन विचाराधीन आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन नगरपालिका आस्थापना खर्चाची अट शिथिल करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१८-११-२०२१) :** (१) व (२) हे खरे नाही, अनुकंपा नियुक्ती योजनंतर्गत केली जाणारी वारसाची नियुक्ती त्याच कर्मचाऱ्यांच्या रिक्त झालेल्या पदावर करण्यात येते त्यामुळे अनुकंपा तत्वावरील प्रकरणांमध्ये आस्थापना खर्चाची मर्यादा लागू राहत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील सार्वजनिक आरोग्य विभागात सर्व संवर्गातील पदे भरणेबाबत

**(२८) ९५२९ (१०-०६-२०२१) श्री.विक्रम काळे, श्री.रामराव पाटील, डॉ.रणजित पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक ६४४८ ला दिनांक ८ मार्च, २०२१ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कोविड-१९ संसर्गामुळे आरोग्य सेवेचे महत्व अधोरेखीत झाले असून सार्वजनिक आरोग्य विभागात “अ”, “ब”, “क” व “ड” संवर्गातील डॉक्टर्स, परिचारीका व वॉर्डबॉय इत्यादींसारख्या आवश्यक असणाऱ्या कर्मचाऱ्यांची ६० टक्के पेक्षा अधिक पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री यांनी आरोग्य विभागातील १६ हजार पदांमध्ये “क” आणि “ड” वर्गातील कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरण्याची घोषणा करून देखील अद्‌याप भरती प्रक्रियेस सुरुवात झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्य शासनाने सन २०२०-२१ मध्ये निश्चित केलेल्या भरती प्रक्रियेत गैरव्यवहार झाला असल्याचा प्रकार निदर्शनास आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर पदे रिक्त असल्याने कोविड व नॉन कोविड रुग्णांना सेवा मिळण्यास अडचणी येत असून कमी मनुष्यबळ असलेल्या कार्यरत कर्मचाऱ्यांवर कामाचा ताण पडत असल्याने सदर पदभरती न करण्याची कारणे काय आहेत,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने राज्यातील सार्वजनिक आरोग्य विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत कोणती उपाययोजना व कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (१७-११-२०२१) :** (१) हे खरे नाही.

सार्वजनिक आरोग्य विभागात गट "अ" "ब" "क" व "ड" संवर्गातील एकूण ३० टक्के पदे रिक्त आहेत.

(२) हे खरे नाही.

कोविड-१९ च्या पार्श्वभुमिवर आरोग्य सेवेचे सक्षमीकरण करण्याकरीता आरोग्य सेवेतील गट-क व गट-ड संवर्गातील १०० टक्के रिक्त पदे भरण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार भरती प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. पैकी गट क संवर्गातील ५०% रिक्त पदे भरण्यासाठी दिनांक २८/०२/२०२१ रोजी परीक्षा घेऊन पदभरती करण्यात आली. उर्वरित गट-क व गट-ड या या संवर्गातील पदे भरण्यासाठी अनुक्रमे दिनांक २४/१०/२०२१ व दिनांक ३१/१०/२०२१ रोजी पदभरती परीक्षा घेण्यात आली आहे.

(३) नाही, औरंगाबाद येथील एका परीक्षा केंद्रावर एका उमेदवाराकडून प्रश्नपत्रिका स्कॅन करून बाहेर प्रसारित करण्याची बाब निदर्शनास येताच, परीक्षा सुरू होण्यापुर्वीच, परीक्षा केंद्राबाहेर सदर उमेदवारास पोलिसांकडून अटकाव करण्यात आल्याची बाब निदर्शनास आली असून या प्रकरणी पोलीस अधीक्षक, औरंगाबाद ग्रामीण यांच्यामार्फत अधिक तपास करण्यात येत आहे.

(४), (५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्य क्षयरोग मुक्त करण्याबाबत

**(२९) ९५६९ (१७-०६-२०२१) श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.संजय दौंड, श्री.सतिश चव्हाण, श्री.अनिकेत तटकरे, श्री.अरुण लाड, श्री.अरुणकाका जगताप :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सार्वजनिक आरोग्य विभाग माहे मार्च, २०२० पासून कोरोना केंद्रित झाल्यामुळे कोविड-१९ पूर्व काळात म्हणजे माहे जानेवारी, २०२० मध्ये १९ हजार क्षयरोग रुग्णांची झालेली नोंद माहे एप्रिल, २०२१ मध्ये १०,०३६ इतकी घटली असल्याचे दिनांक २७ मे, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, डिसेंबर, २०२० मध्ये एसीएफ अभियानांतर्गत केलेल्या आरोग्य तपासणीत ३.३३ लक्ष संभाव्य क्षयरोग निश्चित करुन त्यापैकी १२,८२३ क्षयरोग रुग्णांचे निदान झाल्याचे तर ऑक्टोबर, २०२० ते एप्रिल, २०२१ या कालावधीत कोरोना, क्षयरोग, इन्फ्लुएंजा आजार (आयएलआय) गंभीर श्वसनाचे संसर्ग (एसएआरआय) झालेल्या व्यक्तींच्या केलेल्या तपासणीमध्ये ५,२६४ इतक्या व्यक्तींना क्षयरोग असल्याचे निदान करण्यात आले असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सन २०२५ पर्यंत राज्य क्षयरोग मुक्त करण्याच्यादृष्टीने शासनाने कोणते नियोजन केले आहे तसेच, सन २०२०-२१ व २०२१-२२ या वर्षांत अंदाज संकल्पीय तरतूद किती करण्यात आली होती व त्यापैकी किती निधी खर्च करण्यात आला आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (१७-११-२०२१) :** (१) हे खरे आहे.

राज्यात कोरोनापूर्व काळात माहे जानेवारी, २०२० मध्ये १९,३०२ व एप्रिल, २०२१ मध्ये १०,६३३ इतकी रुग्ण नोंदणी झालेली आहे.
(२) हे खरे आहे.
(३) सन २०२५ पर्यंत राज्य क्षयरोग मुक्त करण्याच्या दृष्टीने आवश्यक साधनसामुग्री, मनुष्यबळ व महत्वाच्या निर्देशांकात अपेक्षित प्रगती याबाबत नियोजन केले आहे.

सन २०२०-२१ च्या पी.आय.पी. नुसार राष्ट्रीय आरोग्य अभियानातून रुपये १४०.०३ लक्ष इतका निधी मंजूर करण्यात आला असून रुपये १०८.६९ लक्ष इतका निधी म्हणजेच ७८ टक्के इतका खर्च करण्यात आला आहे.

सन २०२१-२२ च्या पी.आय.पी. नुसार रुपये २७६२४.१३ लक्ष अनुदान प्रस्तावित करण्यात आले असून अद्याप मंजूरीच्या अधिन आहे.

राज्य शासनाचा निधी सन २०२०-२१ मध्ये रुपये २४,२०,५२७/- इतके अनुदान प्राप्त झाले असून रुपये १९,००,३९१/- इतका खर्च करण्यात आला आहे. सन २०२१-२२ मध्ये माहे जून, २०२१ अखेर रुपये १७,८१,५३०/- इतके अनुदान प्राप्त झाले असून रुपये १,७४,९३३/- इतका खर्च करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## भुसावळ शहरातील साकेगाव हद्दीत असलेल्या ग्रामीण रुग्णालय व ट्रामा केअर सेंटरमध्ये व्हेंटिलेटरअभावी तीन रुग्णांचा मृत्यू झाल्याबाबत

**(३०) ९६०३ (१४-०६-२०२१) श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अमोल मिटकरी, श्री.सतिश चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अनिकेत तटकरे, श्री.संजय दौंड, श्री.अरुण लाड, श्री.अरुणकाका जगताप :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भुसावळ (जि.जळगाव) शहरातील साकेगाव हद्दीत असलेल्या ग्रामीण रुग्णालय व ट्रामा केअर सेंटरला कोरोना काळात पीएम केअर फंडातून माहे सप्टेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान दहा व्हेंटिलेटर पुरविण्यात आले असून सात महिन्यांपूर्वी व्हेंटिलेटर वापरात न आणल्यामुळे (ता.बोदवड), मौ.कासोदा (ता.एरंडोल) व मौ.न्हावी (ता.यावल) येथील तीन रुग्णांचा व्हेंटिलेटरअभावी मृत्यू झाल्याचे दिनांक १८ मार्च, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने भुसावळ शहरातील साकेगाव हद्दीत असलेल्या ग्रामीण रुग्णालय व ट्रामा केअर सेंटरमधील दहा व्हेंटिलेटर कार्यान्वित न करणाऱ्या संबंधितांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (१७-११-२०२१) :** (१) हे खरे नाही.

प्राप्त अहवालानुसार कोरोना काळात पीएम केअर फंडातून पुरवठा करण्यात आलेले दहा व्हेंटीलेटर वापरात होते. तसेच व्हेंटीलेटर अभावी रुग्णाचा मृत्यू झालेला नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बोईसर (जि.पालघर) ग्रामीण रुग्णालयाची नवीन इमारत बांधणेबाबत

**(३१) ९६०५ (१८-०६-२०२१) श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अमोल मिटकरी, श्री.सतिश चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अनिकेत तटकरे, श्री.संजय दौंड, श्री.अरुण लाड, श्री.अरुणकाका जगताप :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोईसर (जि.पालघर) ग्रामीण रुग्णालयाची इमारत मोडकळीस आल्यामुळे नवीन इमारत बांधून ग्रामीण रुग्णालय सुरु करण्याची मागणी लोकप्रतिनिधी आणि तेथील नागरिकांनी शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हाधिकारी, पालघर यांनी आरोग्य विभागास सन २०१८ मध्ये मौ.काटकार पाड्यातील देण्यात आलेला भूखंड न्यायालयीन वादात अडकल्यामुळे त्याऐवजी मौ.सरावली येथील भूखंड ग्रामीण रुग्णालयासाठी देण्यात आल्याचे आदेश निर्गमित केले असल्याचे दिनांक १ मार्च, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ग्रामीण रुग्णालयाची नवीन इमारत बांधकामाचेदृष्टीने जागा ताब्यात घेऊन कामाची निविदा काढण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (२३-११-२०२१) :** (१) व (२) हे खरे आहे.

बोईसर (जि.पालघर) ग्रामीण रुग्णालयासाठी यापूर्वी देण्यात आलेल्या मौजे काटकरपाडा बोईसर येथील जागेबाबत न्यायालयात दावा दाखल असल्याने व त्याबाबतचा निकाल प्रलंबित असल्याने रुग्णहितास्तव मौजे सरावली येथील स.नं.१०४/१ अ एकूण क्षेत्र २.२४.०० हे.आर पैकी ०.६०.०० हे.आर जमीन भूखंड जिल्हाधिकारी, पालघर यांनी दिनांक १९/०३/२०२१ रोजीच्या आदेशान्वये देण्यात आली आहे.

(३) सदर जागेवर इमारत बांधकामासाठीचे अंदाजपत्रक व आराखडे मिळणेबाबत जिल्हा शल्यिचकित्सक, पालघर यांनी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पालघर यांचेकडे मागणी केलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ठाणे जिल्हा सामान्य रुग्णालयाची इमारत बांधण्याबाबत

**(३२) ९६७७ (१४-०६-२०२१) श्री.विक्रम काळे, श्री.शशिकांत शिंदे, श्री.अमोल मिटकरी, श्री.सतिश चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अनिकेत तटकरे, श्री.संजय दौंड, श्री.अरुण लाड, श्री.अरुणकाका जगताप :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्हा सामान्य रुग्णालयाची इमारत सन १९३३ मध्ये बांधण्यात आली असून ती अत्यंत जीर्ण झाल्यामुळे त्याजागी पुनर्विकास करुन प्रथम नियोजनानुसार सात मजल्याची तर नवा डीसी कायदा आल्यामुळे आता १० मजल्याचे रुग्णालय बांधण्यात येणार असल्याचे दिनांक २५ मार्च, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जिल्हा सामान्य रुग्णालयासाठी रुपये ४८९ कोटी इतका खर्च अपेक्षित असून त्याद्वारे ५७४ बेडस् व इतर सुपर स्पेशालिटी इत्यादी व्यवस्था रुग्णांना उपलब्ध होणार असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ठाणे जिल्हा सामान्य रुग्णालयाची इमारत बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (१६-११-२०२१) :** (१) हे खरे आहे.
(२) दिनांक २२/०९/२०२१ च्या शासन निर्णयान्वये, जिल्हा रुग्णालय, ठाणे येथे ३२६ खाटांची वाढ करुन ५०० खाटांचे जिल्हा रुग्णालय, २०० खाटांचे महिला व बाल रुग्णालय व २०० खाटांचे संदर्भ सेवा रुग्णालय (सुपर स्पेशालिटी) यामध्ये श्रेणीवर्धन करण्यास “विशेष बाब” म्हणून मान्यता देण्यात आलेली आहे.
(३) जिल्हा रुग्णालय, ठाणे येथे ९०० खाटांचे जिल्हा रुग्णालय, परिचारिका प्रशिक्षण केंद्र व वस्तीगृह बांधकामाचे अंदाजपत्रक व आराखडा सुधारीत प्रशासकीय मान्यतेकरीता प्राप्त झाला असून, सदर अंदाजपत्रक व आराखडा तांत्रिक मान्यतेकरीता सार्वजनिक बांधकाम विभागास सादर करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## औरंगाबाद शहराचा सिटी सर्व्हे झाला नसल्याबाबत

**(३३) ९७६३ (१५-०७-२०२१) श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद नगरपरिषदेचे महापालिकेत रुपांतर होऊन आज जवळपास ४० वर्षापेक्षा अधिक कालावधी होऊनही अदयाप नव्याने समाविष्ट झालेल्या विस्तारित शहराचा सिटी सर्व्हे झाला नसल्याचे माहे मार्च, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, औरंगाबाद शहराचा सन १९७१ मध्ये सिटी सर्व्हे झाल्यापासून आजमितीस ५१ वर्षे उलटून गेली असूनही नव्याने समाविष्ट झालेल्या विस्तारित शहराचा सिटी सर्व्हे न होण्यामागची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात (१८-११-२०२१) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) औरंगाबाद महानगरपालिकेमध्ये समाविष्ट करण्यात आलेल्या क्षेत्राचे भूमापन करण्याबाबत औरंगाबाद महानगरपालिकेकडून प्रस्ताव भूमी अभिलेख विभागास प्राप्त झालेला नसल्याने नव्याने समाविष्ट झालेल्या शहराचा सिटी सर्वे होऊ शकलेला नाही. आता दिनांक २१/१०/२०२१ रोजीच्या शासन पत्रान्वये औरंगाबाद महानगरपलिकेला याबाबत भूमापन करण्याचा प्रस्ताव भूमी अभिलेख विभागास सादर करण्याच्या सुचना दिल्या असून असा प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर याबाबत तात्काळ कार्यवाही करण्याच्या सुचना जमाबंदी आयुक्त, आणि संचालक, भूमी अभिलेख यांना दिनांक २१/१०/२०२१ रोजीच्या शासन पत्रान्वये देण्यात आलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## भिमा-कोरेगाव (ता.शिरुर, जि.पुणे) येथे घडलेल्या हिंसाचाराची चौकशी करण्याबाबत

**(३४) ९७८२ (२२-०६-२०२१) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अभिजित वंजारी, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर, श्री.राजेश राठोड, श्री.मोहनराव कदम : दिनांक ८ मार्च, २०२१ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ५ मधील प्रश्न क्रमांक ५३९५ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिमा-कोरेगाव (ता.शिरुर, जि.पुणे) येथील विजयस्तंभाला अभिवादन करण्यासाठी दिनांक १ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास आलेल्या जनसमुदायावर काही समाजकंटकांनी हल्ला केल्यानंतर झालेल्या हिंसाचाराच्या घटनेची चौकशी करण्यासाठी माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान स्थापन केलेल्या चौकशी आयोगाचे कामकाज पूर्ण न झाल्यामुळे या चौकशी आयोगास दिनांक ३१ मार्च, २०२१ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तद्नंतर सदर चौकशी आयोगाने आपले कामकाज पूर्ण करुन आपला अहवाल सादर केला आहे काय, अहवालाचे थोडक्यात स्वरुप काय आहे व त्यावर कोणती कार्यवाही करण्यात आली आहे, चौकशी आयोगाचा अहवाल प्राप्त झाला नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत व यासाठी अजून किती कालावधी लागणे अपेक्षित आहे,
(३) असल्यास, या प्रकरणी दाखल झालेल्या सुमारे ६४९ गुन्ह्यांपैकी सुमारे ३४८ गुन्हे मागे घेण्यात आले, तर उर्वरित गुन्हे मागे घेण्याची प्रक्रिया माहे फेब्रुवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान सुरु करण्यात आली होती, एकूण किती गुन्हे दाखल झाले होते व त्यापैकी किती गुन्हे कोणत्या निकषांवर मागे घेण्याची कार्यवाही करण्यात आली, याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील (२२-११-२०२१) :** (१) हे अंशत: खरे आहे.

शासनाने दिनांक ०९/०२/२०१८ रोजी कोरेगाव भीमा चौकशी आयोगाची स्थापना केली आहे. आयोगास दिनांक ३१/१२/२०२१ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती.
(२) आयोगाने अद्याप शासनास अहवाल सादर केला नाही. मार्च, २०२० नंतर संपूर्ण राज्यभर कोविड-१९ मुळे टाळेबंदी लागू झाली होती, त्यादरम्यान आयोगाचे कामकाज बंद असल्यामुळे, आयोगाला अहवाल सादर करता आलेला नाही, असे आयोगाने कळविले आहे. आयोगाने माहे जुलै, २०२१ पासून कामकाज सुरु केले आहे. आयोगाच्या मागणीनुसार आयोगाला अहवाल सादर करण्यास दिनांक ३१/१२/२०२१ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. या मुदतवाढीच्या कालावधीत अंतिम अहवाल सादर करण्यास आयोगाला कळविले आहे.
(३) कोरेगाव भीमा येथे घडलेल्या घटनेच्या अनुषंगाने राज्यभर झालेल्या आंदोलनामध्ये एकूण ६४९ खटले दाखल झाले आहेत. ज्या खटल्यात जिवीत हानी झालेली नाही, रुपये १० लाखापेक्षा जास्त मालमत्तेची हानी झालेली नाही, तसेच पोलीसांवर थेट हल्ला झालेला नाही, या निकषांनुसार ३१७ खटले

मागे घेण्याचा निर्णय घेतला आहे, २०८ खटले "अ" वर्ग समरी केलेले आहेत, ११५ खटले निकषात बसत नसल्यामुळे अमान्य केलेले आहेत, उर्वरित ९ प्रकरणांपैकी ८ प्रकरणामध्ये तपास चालू असून, १ प्रकरणात पुढील कार्यवाही सुरु आहे.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील बंदर आणि सागरी क्षेत्रात बळकटी आणण्यासाठी करण्यात आलेल्या सामंजस्य कराराबाबत

**(३५) ९७८५ (१५-०७-२०२१) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अभिजित वंजारी, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर, श्री.राजेश राठोड, श्री.मोहनराव कदम :** सन्माननीय **बंदरे मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील बंदर आणि सागरी क्षेत्रात बळकटी आणण्यासाठी ५५ हजार ४०० कोटी रुपयांची गुंतवणूक करणारे सामंजस्य करार देशविदेशातील गुंतवणकदारांबरोबर मा.पंतप्रधान यांच्या उपस्थितीत मुंबईत दिनांक २ मार्च, २०२१ रोजी वा त्यासुमारास "भारतीय सागरी परिषदे"च्या वेळी करण्यात आलेले असून यावेळी मुंबई पोर्ट ट्रस्टचे अध्यक्ष, महाराष्ट्र मेरिटाईम बोर्डाचे मुख्य कार्यकारी अधिकारी इ. वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त सामंजस्य करारांचे स्वरुप काय आहे व त्यासाठी कोणत्यास अटी अथवा शर्ती निश्चित करण्यात आलेल्या आहेत, उक्त करारानुसार करावयाची विकास कामे केव्हा सुरु करुन किती कालावधीत पूर्ण करण्यात येणार आहेत व याबाबतची सद्य:स्थिती काय आहेत,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अस्लम शेख (१२-११-२०२१) :** (१) होय.

"दिनांक २ मार्च ते ४ मार्च २०२१ च्या दरम्यान आभासी (व्हर्चुअल) पद्धतीने" भारतीय सागरी परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. ह्या परिषदेमध्ये केंद्र शासनाच्या अखत्यारीतील मुंबई पोर्ट ट्रस्ट आणि विविध संस्था यांच्या दरम्यान सामंजस्य करारांवर मुंबई पोर्ट ट्रस्टच्या अध्यक्षांच्या द्वारे हस्ताक्षर करण्यात आले. सुमारे २८१७.९ कोटी रुपयांची अपेक्षित गुंतवणूक असणारे एकूण २७ सामंजस्य करार यावेळी करण्यात आले आहेत त्यापैकी एक करार महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाशी संबंधित असून तो भारतीय सागरी विद्यापीठ चेन्नई यांच्या बरोबर करण्यात आलेला आहे.

(२) मुंबई पोर्ट ट्रस्टच्या विविध उपक्रमांमध्ये स्वारस्य असणाऱ्या संस्थांबरोबर सामंजस्य करार करण्यात आले. उक्त सामंजस्य करारांचे स्वरुप, त्यातील शर्ती आणि अटी या प्रत्यक्ष अंमलबजावणीच्या वेळी निश्चित करण्यात येतील. उक्त करारांनुसार अंमलबजावणीचा कालावधी १ वर्ष ते १० वर्ष इतका प्रदिर्घ आहे.

महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाने भारतीय सागरी विद्यापीठ चेन्नई यांच्या बरोबर प्रशीक्षण व कौशल्य या करीता आवश्यकतेप्रमाणे सेवा पुरवणे यासाठी करार करण्यात आलेला आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्याला केंद्र शासनाकडून जीएसटी थकबाकी मिळणेबाबत

**(३६) ९८९३ (१७-०६-२०२१) श्री.नरेंद्र दराडे : तारांकित प्रश्न क्रमांक ३०८ ला दिनांक ३ मार्च, २०२० रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कोरोनाचा संसर्ग रोखण्यासाठी लागू केलेल्या लॉकडाऊनमुळे राज्याच्या आर्थिक परिस्थितीवर परिणाम होऊन राज्याचे अर्थचक्र सावरण्यासाठी मागील आर्थिक वर्षातील केंद्र शासनाकडून जीएसटी थकबाकीची रुपये २४ हजार कोटी येणे बाकी आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर थकबाकी राज्याला मिळावी याकरीता मा.वित्त मंत्री यांनी केंद्र शासनाकडे ४३ व्या जीएसटी परिषदेत मागणी केली असून कोरोनावरील प्रतिबंधक लसी, औषधे व वैद्यकीय उपकरणे आदी सेवांवर जीएसटी करामध्ये सवलत द्यावी अशीही मागणी अंतर्भूत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जीएसटीची थकबाकी केंद्र शासनाकडून मिळण्याच्या अनुषंगाने सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री.अजित पवार (०७-१२-२०२१) :** (१) सन २०१९-२०२०, २०२०-२०२१ व सन २०२१-२२ (एप्रिल ते सप्टेंबर, २०२१) या आर्थिक वर्षासाठी केंद्राकडून राज्यास देय रक्कम रुपये २५४८१ कोटी रुपये थकबाकी महाराष्ट्राला येणे आहे. (दिनांक ०५/११/२०२१ रोजीची स्थिती)
(२) होय.
(३) जीएसटी थकबाकी संदर्भात सातत्याने पाठपुरावा सुरु आहे.

---

## भिवंडी (जि.ठाणे) पंचायत समितीच्या आरोग्य विभागामध्ये सक्षम आरोग्य अधिकारी नेमण्याबाबत

**(३७) ९९०४ (१८-०६-२०२१) डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भिवंडी (जि.ठाणे) पंचायत समितीच्या आरोग्य विभागास गेल्या तीन वर्षापासून सक्षम आरोग्य अधिकारी नसल्याचे माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आरोग्य अधिकारी नसल्याने तालुक्यातील आठ प्राथमिक आरोग्य केंद्र व दहा उपकेंद्रांतर्गत येणाऱ्या ग्रामस्थांचे आरोग्य धोक्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कोरोनाच्या संकट काळात सक्षम आरोग्य अधिकारी नसण्यामागची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने भिवंडी पंचायत समितीच्या आरोग्य विभागात सक्षम आरोग्य अधिकारी नेमण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (२६-११-२०२१) :** (१) हे अंशत: खरे आहे.

नियमित तालुका आरोग्य अधिकारी यांनी कामकाजात हलगर्जीपणा केल्यामुळे कारवाई करुन तालुका आरोग्य अधिकारी या पदाचा अतिरिक्त कार्यभार वैद्यकीय अधिकारी दिवा अंजुर यांचेकडे तात्पुरत्या स्वरुपात देण्यात आलेला आहे.

(२) हे खरे नाही.

(३) अशी बाब नाही.

(४) नियमित तालुका आरोग्य अधिकारी यांनी कामकाजात हलगर्जीपणा केल्यामुळे कारवाई करुन तालुका आरोग्य अधिकारी या पदाचा अतिरिक्त कार्यभार वैद्यकीय अधिकारी दिवा अंजुर यांचेकडे तात्पुरत्या स्वरुपात देण्यात आलेला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## भातसा धरणाच्या सिंचनक्षेत्रासाठी आरक्षित पाण्याचे आरक्षण हटविण्यात आल्याबाबत

**(३८) ९९३४ (१७-०६-२०२१) श्री.नागोराव गाणार, श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.प्रवीण दटके, श्री.रामदास आंबटकर, डॉ.परिणय फुके, श्री.रमेशदादा पाटील, श्री.रमेश कराड, श्री.प्रसाद लाड, डॉ.रणजित पाटील :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात केंद्रीय वन विभागाच्या अंतिम मान्यतेअभावी व महानगरांची पिण्याच्या पाण्याची वाढती मागणी लक्षात घेता भातसा धरणाच्या सिंचनक्षेत्रासाठी आरक्षित पाण्याचे आरक्षण हटविण्यात आले असल्याची बाब माहे मार्च, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक १ सप्टेंबर, २०१९ च्या शासन आदेशान्वये हा निर्णय घेण्यात आला असल्याने भातसा धरणाचा ६७ कि.मी.चा उजवा व ५६ कि.मी.चा डावा कालवा सिमीत करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यामुळे शहापूर, भिवंडी व कल्याण तालुक्यातील सिंचनाचे क्षेत्र मोठ्या प्रमाणात घटले असून शेतकऱ्यांच्या हक्काचे पाणी मुंबईला वळविण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उजव्या व डाव्या कालव्यासाठी संपादित जमिनीचा मोबदला अजूनही काही शेतकऱ्यांना मिळाला नसल्याने त्यांना मोबदला देण्यात येणार आहे काय,

(५) असल्यास, सदर शासन निर्णयामुळे सिंचनाचे क्षेत्र २३ हजार हेक्टरवरून ९१९० हेक्टर इतके होणार असल्याने उर्वरित क्षेत्र सिंचनाखाली आणण्यासाठी शासनाने कोणती नवी योजना आखली आहे,

(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयंत पाटील (२६-११-२०२१) :** (१) हे अंशत: खरे आहे.

केंद्रीय वन विभागाची मान्यता प्राप्त होण्यासाठी अंतिम मान्यतेचा प्रस्ताव महसूल व वन विभाग, मंत्रालय यांनी त्यांचे पत्र No.FLD-१२०६/CR. १८८/F-१०, दिनांक २२/०३/२०२१ अन्वये वन व पर्यावरण मंत्रालय, नवी दिल्ली यांचेकडे सादर केला असून त्या अनुषंगाने पाठपुरावा करण्यात येत आहे.

(२) होय. भातसा प्रकल्पाच्या सहाव्या सुप्रमा शासन निर्णय दिनांक ११/०९/२०१९ नुसार भातसा उजवा कालवा कि.मी. ५४ पर्यंत व भातसा डावा कालवा १७ कि.मी. पर्यंत सिमीत करण्यात आलेला आहे.

(३) अंशत: खरे आहे.

भातसा कालव्यांची वन जमिनीमधील कामे करण्यासाठी आवश्यक असलेल्या वनविभागाच्या अंतिम मानतेअभावी कालव्याची सिंचन क्षमता पूर्णतः निर्मिती न झाल्यामुळे तसेच भातसा कालव्यांच्या लाभक्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणात नागरीकरण व औद्योगिकीकरण झाल्यामुळे धरणामध्ये सिंचनाचे शिल्लक राहणारे पाणी बृहन्मुंबई महानगरपालिकेस बिगर सिंचनासाठी (पिण्यासाठी) देण्यात आलेले आहे. भातसा प्रकल्पाचे सिंचनाचे पाणी आरक्षण हे तात्पुरत्या स्वरूपाचे आहे.

(४) होय.

कालव्यास आवश्यक जमिनीचे भुसंपादन प्रस्ताव वेळोवेळी महसूल विभागास सादर करण्यात आले होते. तथापि, काही प्रकरणांमध्ये अद्याप निवाडा झाला नसल्याने प्रलंबित आहेत.

(५) उर्वरीत सिंचन क्षेत्र सिंचनाखाली आणण्यासाठी भातसा प्रकल्पाची पाणी उपलब्धता जलविज्ञान प्रकल्प, नाशिक यांचेकडून तपासणी करण्यात येवून त्यानुसार भातसा प्रकल्पाचे जलनियोजन सुधारीत करण्यात येत आहे. तसेच वनजमिनीसाठी आवश्यक असलेली अंतिम मान्यतेचा प्रस्ताव केंद्र शासनाच्या पर्यावरण व वन विभागास सादर करण्यात आला असून त्यानुसार कालव्यांचे उर्वरीत कामे बंदीस्त नलिका प्रणालीव्दारे पूर्ण करण्यात येवून उर्वरीत सिंचन क्षेत्र सिंचनाखाली आणण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात कोरोनामुळे मृत्यू पावलेल्या खाजगी डॉक्टरांच्या कुटुंबियांना विमा योजनेचा लाभ मिळवून देण्याबाबत

**(३९) १०००६ (१८-०६-२०२१) श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात करोनाच्या दुसऱ्या लाटेमध्ये १५ डॉक्टरांनी प्राण गमावले असून ते केवळ खाजगी वैद्यकीय सेवा देत असल्याच्या कारणास्तव त्यांचे कुटुंबिय विमा योजनेच्या लाभापासून वंचित असल्याचे दिनांक २७ मे, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोरोनामुळे मृत्यू पावलेल्या खाजगी डॉक्टरांच्या कुटुंबियांना विमा योजनेचा लाभ मिळवून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (१७-११-२०२१) :** (१) हे खरे नाही.

राज्यातील खाजगी रुग्णालयात कार्यरत वैद्यकीय व्यावसायिक व त्यांच्या आस्थापनेवर कार्यरत नर्सेस व इतर संवर्गातील आरोग्य कर्मचाऱ्यांच्या सेवा शासनाकडून कोविड रुग्ण सेवेसाठी अधिग्रहित केल्या असल्यास, तसेच खाजगी रुग्णालय, कोविड उपचारासाठी नामनिर्देशित केले असल्यास, त्याठिकाणी कार्यरत डॉक्टर्स तसेच नर्सेस व इतर वैद्यकीय सेवा पुरविणाऱ्या सर्व संवर्गांना प्रधानमंत्री गरीब कल्याण पॅकेजअंतर्गत विमा संरक्षण रुपये ५० लक्ष देय आहे.

| दिनांक १५/०६/२०२१ पर्यंत प्राप्त विमा दावे | | | |
|---|---|---|---|
| दाव्यांची सद्य:स्थिती | शासकीय | खाजगी | एकूण |
| एकूण | १७ | ४६ | ६३ |
| अदा | १० | ०५ | १५ |
| केंद्र शासनास सादर | ०६ | ०४ | १० |
| अमान्य | - | ३६ | ३६ |

तसेच, उपरोक्त तक्त्यातील खाजगी वैद्यकीय व्यवसायिकांचे ३६ विमा प्रस्ताव केंद्र शासनाच्या योजनेमध्ये नमूद केलेल्या अटी व शर्तीनुसार कोविड रुग्णसेवेशी संबंधित नसून, त्यांचे सेवा शासनामार्फत अधिग्रहित केल्या नसल्यामुळे त्यांचे विमा प्रस्ताव प्रधानमंत्री गरीब कल्याण पॅकेज अंतर्गत अमान्य करण्यात आले आहेत.

(२) शासनाच्या दिनांक ०१/१०/२०२० रोजीच्या पत्रान्वये राज्यातील विविध भागात कार्यरत खाजगी वैद्यकीय व्यावसायिकांचे कोविडमुळे झालेले मृत्यू, प्राप्त प्रस्ताव, सातत्याने खाजगी वैद्यकीय व्यावसायिकांच्या संघटनांकडून होत असलेली मागणी व निगडीत व्यावसायिक जोखीम विचारात घेऊन प्रधानमंत्री गरीब कल्याण पॅकेज अंतर्गत सर्व खाजगी वैद्यकीय व्यावसायिकांना विमा संरक्षण देय करण्याविषयी केंद्र शासनाकडे विनंती करण्यात आली आहे. त्यानुषंगाने प्रधानमंत्री गरीब कल्याण पॅकेज अंतर्गत डॉक्टर्स / खाजगी वैद्यकीय व्यावसायिक यांच्या सेवा कोविड रुग्ण सेवेकरीता शासनाने अधिग्रहित केल्या असल्यास, विमा संरक्षण देय आहे. इतर प्रकरणी विमा संरक्षण देय नसल्याबाबतच्या सूचना केंद्र शासनाच्या दिनांक १५/१०/२०२० रोजीच्या पत्रान्वये प्राप्त झाल्या आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## जव्हार (जि.पालघर) तालुक्यातील पतंगशहा कुटीर रुग्णालयात भूलतज्ञ डॉक्टरांची नेमणूक करण्याबाबत

**(४०) १००२२ (१७-०६-२०२१) श्री.रमेश कराड :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जव्हार (जि.पालघर) तालुक्यातील पतंगशहा कुटीर रुग्णालयात भूलतज्ञ डॉक्टर नसल्यामुळे सदर रुग्णालयात सीझरद्वारे प्रसूती होत नसल्यामुळे जव्हार शहर, पंचक्रोशीतील दुर्गम व अतिदुर्गम आदिवासी भागातील गरोदर महिलांना प्रसूती दरम्यानच्या काळात तीव्र गंभीर समस्यांना सामोरे जावे लागत असल्याचे माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत एका राजकीय पक्षाचे जव्हार शहर व तालुक्याचे पदाधिकारी यांनी पतंगशहा कुटीर रुग्णालयात भूलतज्ञ डॉक्टरांची नेमणूक करण्याबाबत सदर रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक यांना दिनांक २७ मे, २०२१ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन चौकशीच्या अनुषंगाने पतंगशहा कुटीर रुग्णालयात भूलतज्ञ डॉक्टरांची नेमणूक करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (२६-११-२०२१) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) जिल्हा शल्य चिकित्सक, पालघर यांचे आदेशानुसार आठवड्यातील दोन दिवस डॉ. प्रसाद तरसे, भुलतज्ञ, उपजिल्हा रुग्णालय, कासा यांच्या सेवा उसनवारी तत्वावर कुटीर रुग्णालय, जव्हार येथे घेण्यात आलेल्या आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेतील नगररचनाकर यांचेवर कारवाई करण्याबाबत

**(४१) १०१७४ (०१-१०-२०२१) श्री.विलास पोतनीस : दिनांक ८ मार्च, २०२१ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक १ मधील प्रश्न क्रमांक ५८८५ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेतील नगररचनाकार श्री.रघुवीर शेळके यांनी टाळेबंदी कालावधीत प्रतिबंधित क्षेत्रातील बांधकामांना बेकायदेशीरपणे परवानगी दिल्याप्रकरणी, तसेच प्रभारी कार्यकारी अभियंता (बांधकाम विभाग) येथे कार्यरत असताना स्वत:च्या मुलास बांधकाम व्यवसायात फायदा करून देण्यासाठी पदावनत करून नगर रचनाकार पदावर बदली करून घेतल्याप्रकरणी दिनांक ९ जून, २०२० रोजीच्या कारणे दाखवा नोटिशी अन्वये त्यांच्याकडून शासनाने खुलासा मागितला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी श्री.रघुवीर शेळके यांनी दिनांक २६ जून, २०२० रोजी शासनास खुलासा सादर केला आहे, शासनास खुलासा प्राप्त होवून अंदाजे तीन महिन्यांचा कालावधी उलटून गेला असूनही खुलाश्यान्वये अद्याप कोणतीही कारवाई करण्यात आली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२६-११-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

- कल्याण-डोंबिवली महानगरपालिका प्रशासनाकडे अशा आशयाची तक्रार प्राप्त झाली होती.
- सदर तक्रारीच्या अनुषंगाने संबंधित नगर रचनाकार यांना कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेमार्फत कारणे दाखवा नोटीस बजावण्यात येऊन खुलासा सादर करण्याचे कळविले, ही वस्तुस्थिती आहे.

(२) व (३) संबंधित नगर रचनाकार यांनी दिनांक २६/०६/२०२० रोजी त्यांचा खुलासा सादर केला असून, सदर खुलासा शिस्तभंगविषयक प्राधिकारी, आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांनी मान्य करून प्रकरणातील तक्रार दप्तरी दाखल केली असल्याचे, कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने कळविले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील कृषी विद्यापीठातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोग लागू करण्याबाबत

**(४२) १०१८० (०६-१०-२०२१) श्री.विलास पोतनीस : दिनांक १५ डिसेंबर, २०२० रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक १२ मधील प्रश्न क्रमांक ६२६५ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील कृषी विद्यापीठातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोग लागू करण्याबाबतच्या प्रस्तावास वित्त विभागाने सहमती दर्शविली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील कृषी विद्यापीठातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोग लागू करताना विधी व न्याय विभागाचे अभिप्राय प्राप्त करुन घ्यावे, असे मत वित्त विभागाने याबाबतच्या अभिप्रायात मांडले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यानुषंगाने विधी व न्याय विभागाचे अभिप्राय शासनाने प्राप्त करुन घेतले आहेत काय, त्यानुसार विधी व न्याय विभागाने कोणते अभिप्राय दिले आहेत,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने याबाबत धोरणात्मक निर्णय घेऊन राज्यातील कृषी विद्यापीठातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोग लागू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (०२-११-२०२१) :** (१) होय.
(२) व (३) हे खरे नाही.
(४) राज्यातील कृषी विद्यापीठातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोग लागू करण्याकरीता कृषी व पदुम विभाग शासन निर्णय क्र.कृषीवि-३७१९/प्र.क्र.४०/६-अे दिनांक १६/०२/२०२१ रोजी निर्गमित करण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्य शासनाच्या सेवेतील पदभरतीचे प्रमाण ५०:५० टक्के ठेवण्याबाबत

**(४३) १०१८५ (०१-१०-२०२१) श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाच्या सेवेतील पदभरतीचे प्रमाण ५०% सरळसेवा आणि ५०% पदोन्नतीने ठेवण्याबाबत प्रशासकीय पुनर्रचना समितीने केलेल्या शिफारसीचा स्वीकार करून दिनांक २६ मार्च, १९७० रोजीच्या शासन परिपत्रकाद्वारे सरळसेवा व पदोन्नतीचे प्रमाण ५०:५० टक्के ठेवण्याबाबत सर्व प्रशासकीय विभागांना शासनाने कळविले असून त्यानुषंगाने सेवा प्रवेश नियमात सुधारणा करण्याचे आदेश देण्यात आले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाच्या विविध विभागात सरळसेवेतील महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या माध्यमातून घेण्यात येणाऱ्या परीक्षेतील रिक्त असलेली पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची मान्यता न घेता काही कालावधीसाठी तदर्थ पदोन्नतीच्या माध्यमातून भरण्यात येत असून या पदावर सरळसेवेच्या

माध्यमातून महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून शिफारस करून आलेल्या उमेदवारांची नियुक्ती करताना तदर्थ पदोन्नती दिलेल्या कर्मचाऱ्यास मूळ पदावर पाठविण्यात येत असल्याने नोकरभरतीसाठी तयार करण्यात आलेल्या सेवा प्रवेश नियमांचे अनुकरण होत नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेतील सरळ सेवेच्या कोट्यातील पदांवर तदर्थ पदोन्नतीने नियुक्त्या देण्यात येवून त्या कायम ठेवण्यात येत असल्याने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या माध्यमातून घेण्यात येणाऱ्या स्पर्धा परीक्षांचा अभ्यास करणाऱ्या उमेदवारांवर अन्याय होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले आहे, त्यानुषंगाने शासनाच्या विविध विभागात तदर्थ पदोन्नतीच्या माध्यमातून भारतीय राज्य घटनेच्या अनुच्छेद ३०९ अंतर्गत जारी केलेला सेवा प्रवेश नियम डावलून भरण्यात येत असलेल्या पदांबाबत चौकशी करून सुरु असलेला गैरप्रकारास आळा घालण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उध्दव ठाकरे (१७-११-२०२१) :** (१) प्रशासकीय पुर्नरचना समितीच्या शिफारशीनुसार सरळसेवा व पदोन्नतीने भरावयाच्या पदांच्या प्रमाणाबाबत शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग दिनांक २६/०३/१९७० अन्वये सर्व मंत्रालयीन विभागांना सुचना देण्यात आल्या होत्या.

मात्र शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग दिनांक ०९/०९/२०२१ अन्वये शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग दिनांक २६/०३/१९७० अधिक्रमित करण्यात आले असून सेवाप्रवेश नियमांचा आदर्श नमुना विहित करण्यात आला आहे. त्यानुसार नियुक्ती दयावयाचे पद व त्याखालील निम्न संवर्गातील पद या दोन्ही पदांच्या मंजूर पदसंख्या विचारात घेऊन पदोन्नती व नामनिर्देशन याव्दारे दयावयाच्या नियुक्तीचे प्रमाण निश्चित करण्यासंदर्भात तपशीलवार सूचना उक्त शासन निर्णयाव्दारे देण्यात आल्या आहेत.

(२) व (३) हे खरे नाही.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेतील पदांवर सरळसेवेने करावयाच्या नियुक्त्या आयोगाने पुरस्कृत केलेल्या उमेदवारांच्याच नियुक्तीने करणे बंधनकारक आहे. त्यामुळे सरळसेवा कोटयातील रिक्त पदांसाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे मागणीपत्र पाठविल्यानंतरच आयोगाकडून उमेदवार उपलब्ध होण्यास लागणारा कालावधी लक्षात घेता, पदांच्या रिक्ततेमुळे प्रशासकीय कामाचा खोळंबा होऊ नये, या उद्देशाने केवळ तात्पुरती व्यवस्था म्हणून सरळसेवेच्या कोटयातील पदांवर मागणीपत्रात नमूद केलेल्या रिक्त पदांच्या मर्यादेतच तदर्थ पदोन्नती देण्यास मान्यता देण्यात येते. ही तदर्थ पदोन्नती ११ महिन्यांच्या कालावधीकरीता किंवा महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून नियमित उमेदवार उपलब्ध होईपर्यंत, यापैकी जे अगोदर घडेल ते, या अटीच्या अधीन राहून देण्यास मान्यता देण्यात येते.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सिंधुदुर्ग जिल्ह्यासाठी सहाय्यक कामगार आयुक्त नेमण्याबाबत

**(४४) १०१८८ (२०-०७-२०२१) श्री.विलास पोतनीस** : सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्ह्याचे सहाय्यक कामगार आयुक्त पद सद्य:स्थितीत रिक्त असून सांगली जिल्ह्याच्या सहाय्यक कामगार आयुक्त यांच्याकडे सिंधुदुर्ग जिल्ह्याचा प्रभारी पदभार देण्यात आला असल्याने सुरक्षा रक्षक व अन्य कामगारांचे विविध प्रश्न प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सिंधुदुर्ग जिल्ह्यासाठी कायमस्वरूपी सहाय्यक कामगार आयुक्त नेमण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (१६-११-२०२१) :** (१) हे खरे नाही,

सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये सहायक कामगार आयुक्त हे पद मंजूर नसुन सरकारी कामगार अधिकारी हे पद मंजूर आहे. सरकारी कामगार अधिकारी हे पद माहे ऑक्टोबर २०२० पासून रिक्त असून सदर पदाचा अतिरिक्त कार्यभार सरकारी कामगार अधिकारी, रायगड यांचेकडे देण्यात आलेला आहे. रत्नागिरी व सिंधुदूर्ग या दोन जिल्ह्यासाठी सुरक्षा रक्षक मंडळ, हे रत्नागिरी कार्यरत आहे.

(२) सरकारी कामगार अधिकारी या संवर्गातील सरळसेवेने पदे भरण्यासाठी दिनांक २७/०९/२०२१ रोजी सामान्य प्रशासन विभागामार्फत महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे मागणीपत्र पाठविण्यात आले आहे. त्यानुषंगाने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने दिनांक ०४/१०/२०२१ रोजी जाहिरात प्रसिध्द केलेली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात म्युकरमायकोसीसचा प्रादुर्भाव रोखण्याबाबत

**(४५) १०१९० (२०-०७-२०२१) श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात गत महिन्याभरात म्युकरमायकोसीसच्या रुग्णांची संख्या ८० टक्क्यांनी वाढली असून तसेच मृतांच्या संख्येतही ८३ टक्क्यांनी वाढ झाली असून सर्वाधिक रुग्ण नागपूर, पुणे, औरंगाबाद आणि मुंबई येथील असल्याची माहिती दिनांक १६ जून, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन म्युकरमायकोसीसचा प्रादुर्भाव रोखण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (१५-११-२०२१) :** (१) हे अंशत: खरे आहे.

राज्यात माहे जून महिन्यात गत महिन्याच्या म्हणजेच माहे, मे २०२१ च्या तुलनेत म्युकरमायकोसिसच्या रुग्णसंख्येमध्ये ५३ टक्के घट झालेली आहे. तसेच मृतांच्या संख्येत १६ टक्क्यांनी वाढ झाली आहे. तथापि,

राज्यात इतर जिल्ह्यांच्या तुलनेत सर्वाधिक रुग्णांची नोंद नागपूर, पुणे, औरंगाबाद आणि मुंबई येथे झाल्याची माहिती खरी आहे.

(२) म्युकरमायकोसिस प्रतिबंध व नियंत्रणासाठी पुढील उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत.

१) राज्याने कैंद्रीय आरोग्य मंत्रालयाच्या दिनांक २० मे, २०२१ रोजीच्या सूचनांन्वये म्युकरमायकोसिस या आजाराला “साथरोग कायदा-१८९७” अंतर्गत दिनांक २५ मे, २०२१ रोजी अधिसूचित केलेले आहे.

२) राज्यातील सर्व जिल्हा/ महानगरपालिकांना म्युकरमायकोसिस चे रुग्ण हाताळण्यासंबंधी मार्गदर्शक सूचना देण्यात आलेल्या आहेत.

३) शासन निर्णय क्र. मफुयो-२०२१/प्र.क्र.१०३/ आरोग्य-६, दिनांक १८ मे, २०२१ नुसार म्युकरमायकोसिस आजारावर महात्मा ज्योतीबा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत मोफत उपचार करण्यास मान्यता प्रदान करण्यात आली होती.

४) राज्यामध्ये म्युकरमायकोसिस उपचार देणारी एकूण ५९२ रुग्णालये असून, त्यापैकी १३१ रुग्णालयांमध्ये महात्मा ज्योतीबा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत रुग्णांना पूर्णत: मोफत उपचार केले जात आहेत. तसेच ४२ शासकीय रुग्णालये व ४१९ खाजगी रुग्णालयांतर्गत रुग्णोपचार होत आहेत.

५) आयुक्तालयाकडील दिनांक १७/०५/२०२१, दिनांक १९/०५/२०२१ व दिनांक ०२/०६/२०२१ रोजीच्या परिपत्रकानुसार सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत शासकीय रुग्णालये, वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय तसेच महानगरपालिका रुग्णालयामध्ये उपचारार्थ दाखल असणाऱ्या रुग्णांना मोफत औषधे उपलब्ध करुन देणेबाबत कळविण्यात आले होते.

६) शासन अधिसूचना क्र. म्यूकर २०२१/ प्र.क्र.२५७/आ-५, दिनांक ३ जून, २०२१ नुसार खाजगी रुग्णालयांनी म्युकरमायकोसिस आजारावरील उपचारासाठी आकारावयाचे दर निश्चित करण्यात आले.

७) राज्यातील आरोग्य संस्थांना म्युकर-मायकोसिसवरील उपचारासाठी औषधांचा राज्य स्तरावरुन पुरवठा करण्यात आला असून शासन निर्देशानुसार शासकीय व खासगी आरोग्य संस्थांमध्ये दाखल म्युकरमायकोसिस रुग्णांना सदरचे इंजेक्शन उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सोलापूर महानगरपालिका प्रशासनाने कोरोनाच्या उपचाराकरीता खरेदी केलेली औषधे कालबाहय झाल्याबाबत

**(४६) १०२३२ (०१-१०-२०२१) श्री.नागोराव गाणार, श्री.प्रविण दरेकर, अॅड.निरंजन डावखरे, श्री.विजय उर्फ भाई गिरकर, श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर महानगरपालिका प्रशासनाने कोरोनाच्या उपचाराकरीता गत वर्षभरापासून खरेदी केलेली १ कोटी रुपयांची औषधे कालबाहय (expired) झाली असल्याची बाब माहे मे, २०२१ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणामुळे सोलापूर महानगरपालिका प्रशासनाच्या संवेदनशीलतेवर आणि कार्यक्षमतेवर अनेक प्रश्नचिन्ह निर्माण होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने अशा घटना पुन्हा घडू नयेत यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (३०-११-२०२१) :** (१), (२) व (३) सोलापूर महानगरपालिकेकडून कोरोना कालावधीत मे, २०२१ मध्ये खरेदी करण्यात आलेली औषधे कालबाह्य झालेली नाहीत. तथापि, कोरोना प्रादुर्भाव उद्भवणेपूर्वीच्या कालावधीत उपलब्ध झालेली काही औषधे कालबाह्य झाल्याचे आढळून आले आहे. त्याची एकूण किंमत रुपये ४,६६,२७५/- इतकी आहे. यासंदर्भात महानगरपालिकेच्या स्तरावर तपासणीअंती दोषी असणाऱ्या संबंधित आरोग्य अधिकारी यांना कारणे दाखवा नोटीस देण्यात आली आहे. तसेच त्यांनी दाखविलेल्या निष्काळजीपणाबाबत त्यांचेविरुध्द महानगरपालिकेने सार्वजनिक आरोग्य विभागाकडे शिस्तभंग विषयक कारवाई प्रस्तावित केली आहे.तसेच या प्रकरणाशी संबंधित मिश्रक यांना कारणे दाखवा नोटीस देण्यात आली असून महानगरपालिकेने त्यांची अन्य ठिकाणी खात्यांतर्गत बदली केली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील कोतवालांना चतुर्थश्रेणीचा दर्जा व इतर सुविधा लागू करण्याबाबत

**(४७) १०२५७ (०६-१०-२०२१) श्री.नागोराव गाणार, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.गिरीशचंद्र व्यास : दिनांक १५ डिसेंबर, २०२० रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक १२ मधील प्रश्न क्रमांक ५८०८ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील तलाठी यांचे मदतनीस म्हणून काम पाहणारे कोतवालांनी चतुर्थश्रेणी दर्जा प्राप्त होण्यासाठी आंदोलने, मोर्चे व निवेदनांच्या माध्यमातून शासनाकडे मागणी केली असल्याचे माहे ऑगस्ट, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील मानधनावरील कर्मचाऱ्यांचा एकत्रित विचार करुन त्यांना सामाजिक सुरक्षा प्रदान करण्याकरीता शासनाने "एकछत्र योजना" तयार करण्यासाठी गठीत केलेल्या समितीच्या शिफारशीनुसार कर्मचाऱ्यांना किमान वेतनापेक्षा कमी मानधन देण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, एकछत्र योजनेत प्रत्येक कोतवालास सेवा कालावधी ० ते १० पर्यंत दरमहा रुपये १५,०००/- इतके मानधन आणि सेवा कालावधी ११ ते २० वर्ष ३% वाढीनुसार, २१ ते ३० वर्ष ४% वाढीनुसार व ३१ वर्षांवरील ५% वाढीनुसार मानधन देण्याबाबत कोतवालांनी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, "अटल निवृत्तीवेतन योजना" व "महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना" राबविण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोतवालांना चतुर्थश्रेणीचा दर्जा व इतर सुविधा लागू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात (१८-११-२०२१) :** (१) होय.

(२) “कोतवाल” हे मानधनावरील पद आहे.

राज्यातील कोतवाल, पोलीस पाटील, आशा वर्कर्स् व अंगणवाडी सेविका या व अशा मानधनावरील कर्मचाऱ्यांचा एकत्रित विचार करुन त्यांना सामाजिक सुरक्षा प्रदान करण्याकरीता राज्य शासनाने “एकछत्र योजना” तयार करण्यासाठी शासन निर्णय दिनांक १८/०३/२०१७ अन्वये राज्यस्तरीय सचिव समिती गठीत करण्यात आली होती.

समितीने सादर केलेल्या शिफारशी लक्षात घेवून, महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र.बैठक-२०१६/ प्र.क्र.५८१/ई-१०, दिनांक ०६/०२/२०१९ व दिनांक ०१/०३/२०१९ अन्वये सेवा कालावधी ० ते १० पर्यंत रुपये ७५००/-, सेवा कालावधी ११ ते २० वर्ष-३% वाढीनुसार रुपये ७७२५/-, सेवा कालावधी २१ ते ३० वर्ष-४ % वाढीनुसार रुपये ७८००/-, सेवा कालावधी ३१ वर्षावरील ५% वाढीनुसार रुपये ७८७५/- व ५० वर्षापेक्षा जास्त वय असलेल्या प्रत्येक कोतवालास दरमहा रुपये १५०००/- इतके मानधन लागू करण्यात आले आहे.

(३) नाही.

महाराष्ट्र राज्य कोतवाल संघटनेने माहे ऑगस्ट-२०२१ मध्ये निवेदनाद्वारे सर्व कोतवालांना रुपये १५,०००/- मानधन देण्याबाबत विनंती केलेली आहे.

(४) महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र.बैठक-२०१६/प्र.क्र.५८१/ई-१०, दिनांक ०६/०२/२०१९ व दिनांक ०१/०३/२०१९ अन्वये “अटल निवृत्तीवेतन योजना” व “महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना” या योजनांचे हप्ते शासनाकडून भरण्यात येणार आहेत. त्याकरीता सदर योजनांच्या हप्त्याकरीता लागणाऱ्या निधीचा जिल्हानिहाय तपशील क्षेत्रिय कार्यालयकडून मागविण्यात आलेला आहे.

(५) व (६) “कोतवाल” हे पद मानधनावरील आहे. सबब, कोतवालांना चतुर्थश्रेणी दर्जा देण्याबाबत संघटनेची मागणी अमान्य करण्यात आलेली आहे.

---

## कल्याण-शीळ फाटा रस्त्यांचे नियंत्रक असलेल्या महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने निळजे पूलाच्या डागडुजींच्या कामासाठी लागणारा निधी रेल्वेकडे भरणा करण्याबाबत

**(४८) २२५७५ (२०-०४-२०१७) श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कल्याण-शीळ फाटा रस्त्यांचे नियंत्रक असलेल्या महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने निळजे पूलाच्या डागडुजींच्या कामासाठी लागणारा सुमारे १५ लाखांचा भरणा रेल्वेच्या बांधकाम विभागाकडे अद्यापी केलेला नाही, हे खरे आहे काय,
(२) महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून या निधीचा भरणा झाला नसल्याने सदर पुलाची दुरुस्ती न करण्याचा निर्णय रेल्वेने घेतला असल्याने पुलाचे काम प्रलंबित आहे, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर रक्कम रेल्वेकडे न भरण्याची कारणे काय आहेत तसेच उपरोक्त पुलाचे काम पूर्ण होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

**श्री.एकनाथ शिंदे (१८-११-२०२१) :** (१) हे खरे नाही.

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने निळजे पूलाच्या डागडुजीच्या कामासाठी लागणारा रुपये १८,९५,६१९/- इतक्या रकमेचा निधी धनादेश क्रमांक ८०९५७२ दिनांक ०६/०९/२०१६ अन्वये रेल्वे विभागास अदा केलेला आहे.
(२) महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून निळजे येथील रेल्वे पूलाच्या डागडुजीच्या कामासाठी लागणारा खर्च रेल्वे विभागास प्राप्त झाल्यानुसार रेल्वे विभागाकडून निळजे पूलाच्या डागडुजीचे काम दिनांक ०८/०५/२०१६ ते २२/०५/२०१६ या कालावधीत पूर्ण करण्यात आले असून सदरचा पूल वाहतुकीसाठी खुला करण्यात आलेला आहे
(३) प्रश्न उद्भवत नाही.

सदरहू काम दिनांक २२/०५/२०१६ रोजी पूर्ण झालेले आहे.

---

## राज्यात दिव्यांग कक्षातील क्लिनिकल सायकोलॉजिस्ट पद भरण्याबाबत

**(४९) ४७२३७ (०५-०७-२०१९) श्री.गोपिकिशन बाजोरीया :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात दिव्यांग कक्ष सुरु करण्यात आले असून अनेक ठिकाणी क्लिनिकल सायकोलॉजिस्ट पद भरण्यात आले नसल्याचे माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, क्लिनिकल सायकोलॉजिस्ट हे पद भरण्यात आले नसल्याने हजारो मनोविकार रुग्णांचे अर्ज तपासणीविनाच पडून आहेत तसेच रुग्णांना दिव्यांग प्रमाणपत्रापासून वंचित राहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने क्लिनिकल सायकोलॉजिस्ट पद भरणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (१५-११-२०२१) :** (१) हे खरे नाही.

राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात दिव्यांग कक्ष सुरु करण्यात आले असून एकूण ३४ जिल्हयांमध्ये चिकित्सालयीन मानसशास्त्राची एकूण ३० पदे कंत्राटी स्वरुपात भरण्यात आलेली असून ४ पदे रिक्त आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील जिल्हा परिषद पंचायत समितीच्या कर्मचाऱ्यांना ऑफलाईन पध्दतीने वेतन देण्याबाबत

**(५०) ४७९७९ (०५-०७-२०१९) ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील जिल्हा परिषद पंचायत समितीच्या कर्मचाऱ्यांना ऑफलाइन पध्दतीने सातव्या वेतन आयोगाने वेतन देण्याबाबत कार्यवाही करण्याची मागणी लोकप्रतिनिधी, कोकण पदवीधर मतदार संघ यांनी दिनांक ३० एप्रिल, २०१९ रोजी वा त्यासुमारास प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांना निवेदनाद्वारे केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनावर शासनाने कोणता निर्णय घेतला आहे व त्याचे थोडक्यात स्वरूप काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (१८-११-२०२१) :** (१) नाही, हे खरे नाही.

शासकीय अभिलेखांची तपासणी केली असता प्रस्तुत निवेदन या विभागास प्राप्त झाल्याचे आढळून आलेले नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**श्री.राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.